| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक ५४ वा | गुरूवार दिनांक ०१ मे, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)

(सांज दैनिक) पोष्ट परवाना

L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

dainiklatursamachar@gmail.com

बातम्या, लेख व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या




## प्रतिकूल परिस्थितीत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण पुष्पराज खोत यांचा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते सत्कार

धाराशिव ,(जिमाका):- जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील सटवाईवाडी येथील पुष्पराज नानासाहेब खोत यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अभ्यास करून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (णझडउ) परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. त्यांनी देशभरातून ३२१ वा क्रमांक पटकावला आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचा सत्कार आज पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला.सत्कार समारंभाला जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलीस अधीक्षक संजय जाधव,जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्यासह अन्य प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री.सरनाईक बोलतांना म्हणाले की,केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत देशभरातून मोजकीच मुले यश मिळवतात. अशा कठीण परीक्षेत ग्रामीण भागातील, प्रतिकूल परिस्थितीतील विद्यार्थ्याचे यश अत्यंत प्रेरणादायी आहे.



श्री.सरनाईक पुढे म्हणाले,हे यश फक्त पुष्पराज यांचे नाही,तर त्यांचे मार्गदर्शक शिक्षक,प्रोत्साहन देणारे पालक आणि नातेवाईक यांचेही आहे.त्यांच्या जिद्दीतून आणि परिश्रमातून अनेक तरुणांना प्रेरणा मिळेल.

शेवटी,त्यांनी पुष्पराजला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत सांगितले की, यशाला शॉर्टकट नसतो.कष्ट आणि सातत्य हेच यशाचे खरे सूत्र आहे.असे ते म्हणाले.

## अतिवृष्टीतील अनुदानासाठी शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन: रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

लोहारा (प्रतिनिधी)- उमरगा-लोहारा तालुक्यातील अतिवृष्टी नुकसान भरपाई अनुदान प्रस्ताव मंजूर करुन शेतकऱ्यांना वाटप करण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी मंगळवारी (दि.२९) लोहारा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. तसेच रास्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला.

तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गतवर्षी धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले होते. जिल्हा प्रशासनाने धाराशिव, कळंब, परंडा, वाशी या चार तालुक्याचा अतिवृष्टी अनुदान प्रस्ताव ८ ऑक्टोबर २०२४ रोजी शासनाला पाठवला होता. तो मंजूर होऊन बऱ्यापैकी वितरणही झाले. उमरगा, लोहारा तालुक्यात उशिराने पाऊस झाल्याने या दोन्ही तालुक्यांचा अतिवृष्टी मागणी प्रस्ताव शासनाकडे १५ ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हा प्रशासनाने पाठविला होता. परंतु त्याला मंजुरी मिळाली नाही. राज्यातील इतर जिल्ह्यांमधील जानेवारी महिन्यातील अतिवृष्टी अनुदान मागणी प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे लोहारा, उमरगा तालुक्यातील ७९,८८६ शेतकरी हक्काच्या ८६ कोटी ४६ लाख रुपयांच्या मदतीपासून वंचित आहेत. याकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी लोहारा तहसील कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी धरणे आंदोलन केले. आंदोलनात आमदार प्रविण स्वामी, राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती अध्यक्षा सक्षणा सलगर, शिवसेना (ठाकरे) युवानेते अजिंक्य पाटील, काँग्रेस तालुकाध्यक्ष शामसुंदर तोरकडे, शिवसेना (ठाकरे) तालुकाप्रमुख अमोल बिराजदार आदी सहभागी झाले. योग्य वेळी प्रस्ताव दाखल करुनही विलंब नागपूर येथील अतिवृष्टी नुकसानभरपाई अनुदान प्रस्ताव उशिरा दाखल होऊन मंजूर झाला. शेतकऱ्यांना अनुदान वाटप झाले. लोहारा, उमरगा तालुक्यातील शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई अनुदान प्रस्ताव वेळेवर दाखल होऊनही मंजूर झाले नाहीत अनुदान मिळेपर्यंत लढा देण्याचा निर्धार करत त्यासाठी तीव्र आंदोलनाचा इशारा आमदार प्रवीण स्वामी यांनी दिला.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या "महाराष्ट्र गौरव रथयात्रे"चे धाराशिवमध्ये जल्लोषात स्वागत

धाराशिव (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या ६५ व्या वर्षाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या ममहाराष्ट्र गौरव रथयात्रेफ्चे बुधवारी, दि. ३० रोजी धाराशिव शहरात आगमन झाले. यावेळी यात्रेचे शहरात उत्स्फूर्त आणि जल्लोषी स्वागत करण्यात आले. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून या यात्रेला सुरुवात झाली होती. धाराशिव शहरात यात्रेच्या स्वागताप्रसंगी राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक, ख्वाजा शमशोद्दीन गाजी दर्गा, छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि श्री संत गोरोबाकाका मंदिर या पवित्र ठिकाणांहून माती आणि जल घेऊन यात्रेचे पुढील मार्गासाठी प्रस्थान करण्यात आले. यावेळी बोलताना आमदार विक्रम काळे यांनी सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष केवळ राजकारण करत नाही, तर सामाजिक बांधिलकी जपत महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा आणि शाहू-फुले-आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांचा वारसा पुढे नेत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून आणि प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही यात्रा सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. आ. काळे हे यात्रेचे मराठवाडा समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.यात्रेला सर्वपक्षीय आणि सर्व समाजातील घटकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे सांगून आ. काळे म्हणाले की, महाराष्ट्राच्या ६५ वर्षांच्या वाटचालीत कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या मान्यवरांचा गौरव १ ते ५ मे दरम्यान मुंबईतील जांबोरी मैदान येथे होणाऱ्या मगौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाफ्त करण्यात येणार आहे.

या स्वागत प्रसंगी आ. विक्रम काळे यांच्यासह प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे, प्रदेश संघटक सचिव खलील पठाण, जिल्हा कार्याध्यक्ष समीयोदिन मशायक, शहराध्यक्ष सचिन तावडे, तालुकाध्यक्ष प्रशांत फंड, मनोज मुदगल, अकबर पठाण, सामाजिक न्याय प्रदेश सरचिटणीस सचिन सरवदे, ड. इंद्रजीत शिंदे, विशाल शिंगाडे, दिग्विजय शिंदे, अतुल जगताप, असद पठाण, सतीश घोडेराव, बालाजी वगरे, विवेक साळवे, महम्मद अबूबकर कोतवाल, बालाजी शिंदे, निहाल शेख, राजाभाऊ जानराव, अराफत काझी, सुजित बारकुल, प्रताप शिंदे, सौरभ देशमुख, दत्ता देशमुख यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्राईम न्युज

### पाणी पुरवठा योजनेच्या विहिरीवरील मोटार व केबलची चोरी

परंडा (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नसीर जहुरोद्दीन शहाबर्फीवाले, वय ५० वर्षे, रा. मंगळवार पेठ परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांचे करंजा येथील शासकीय पाणी पुरवठा योजनेच्या विहरीवरील एको पल्स एच. पी. कंपनीची मोटार व केबल अंदाजे ७,००० किंमतीचे ही दि.११.०४.२०२५ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नसीर शहाबर्फीवाले यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### सोन्याचे दागिने व रोख असा एकुण १,२९,५०० रू मालाची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- अज्ञान गोविंद पाटील, वय ६० वर्षे, रा. माडज ता. उमरगा जि. धाराशिव यांचे राहते घराचे किचन रुमचा दरवाजाचा कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.२७.०४.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील स्टिलच्या डब्यातील २७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ६२,००० असा एकुण १,२९,५०० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी अज्ञान पाटील यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### तडजोड शुल्क वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२९ एप्रिल रोजी मोटार वाहन कायदा- नियम भंग प्रकरणी एकुण ३२६ कारवाया करुन २,७८,१५० तडजोड शुल्क वसुल केले आहे.



## पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे धाराशिव विमानतळ येथे आगमन व स्वागत

धाराशिव (जिमाका)- पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे आज धाराशिव विमानतळ येथे विमानाने आगमन झाले.पालकमंत्री श्री.सरनाईक यांचे आगमन प्रसंगी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांनी पुस्तक देऊन तर पोलीस अधीक्षक संजय जाधव व माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव,एस टी चे विभाग नियंत्रक विनोद भालेराव,उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके, उपविभागीय अधिकारी अरुणा गायकवाड यांची उपस्थिती होती.

## जिल्हा परिषद शाळामधील सर्व रेकॉर्ड संगणकीकरण तसेच पुनर्लेखन करावे -श्री. संजय दुधगावकर

धाराशिव(प्रतिनिधी)- निर्गम उतारे काढण्यासाठी आवश्यक असलेल्या जिल्हाभरातील जिल्हा परिषद शाळामधील जुन्या व नव्या सर्व रेकॉर्डचे स्कॅन करून जतन व संवर्धन करून संगणकीकरण तसेच पुनर्लेखन करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे मगळवारी (दि.२९) निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात श्री. दुधगावकर यांनी म्हंटले की, मराठा समाजासाठी देण्यात आलेल्या एसईबीसी आरक्षणाचे व खुल्या प्रवर्गासाठी देण्यात आलेल्या ईडब्ल्यूएस आरक्षणाचे प्रमाणपत्र काढण्यासाठी १९६७ पूर्वीचा पुरावा मागितला जातो. या १९६७ पूर्वीच्या पुराव्यासाठी तसेच मराठा समाजासाठी जातीचा उल्लेख असलेले जिल्हा परिषद शाळेमध्ये जुन्या नोंदीच्या आधारे निर्गम उतारे काढले जातात. परंतु जिल्हा परिषदेच्या दुर्लक्षामुळे बहुतांश जिल्हा परिषद शाळामधील जुने रेकॉर्ड खराब झाले असून काहींचे पुरावे नष्ट झाले झाले असून काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. ते रेकॉर्ड खराब झाल्यामुळे आज एसईबीसी व ईडब्ल्यूएस प्रवर्गातील विद्यार्थ्यांची व नागरिकांची मोठी अडचण होत आहे. त्या प्रवर्गात येत असूनही त्यांची मोठी अडचण होत आहे. भविष्यात तर हे रेकॉर्ड नष्ट झाल्यास येणाजया पिढ्यांची मोठी हानी होणार आहे. त्यामुळे या सर्व परिस्थितीचा विचार करता संपूर्ण जिल्ह्याभरातील सद्यस्थितीत ज्या प्रकारे रेकॉर्ड त्या सर्व फाटक्या तुटक्या रेकॉर्डसहित नव्या जुन्या सर्वांचे स्कॅन करून त्याचे जतन व संवर्धन करावे. तसेच नष्ट होण्याच्या मार्गावर असलेल्या सर्व नोंदीचे स्कॅन व त्यासोबत पुनर्लेखनदेखील करावे अशी विनंती केली आहे. तसेच जिल्ह्यात काही ठिकाणी लोकांकडे जुन्या काळात घेतलेल्या छेडछाड न केलेले मूळ प्रतीतील निर्गम उतारे व मूळ टी. सी. उपलब्ध असतील तर त्याची देखील सक्षम अधिकाजयामार्फत किंवा समिती नेमून तपासणी करावी. खराब होत चाललेल्या रेकॉर्डचे जतन व संवर्धन करताना त्याचादेखील आधार घेण्यात यावा. जेणेकरून पुढील पिढ्यांचे गंभीर नुकसान टळेल. त्यामुळे वरील मुद्द्यांचा गांभीर्याने विचार करून निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी श्री. दुधगावकर यांनी केली आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## महाराष्ट्र दिन...........

देशात महाराष्ट्राची छाप वेगळी आहे. ज्या-ज्या वेळी देशावर संकटे आली त्या-त्यावेळी महाराष्ट्र धावुन गेला आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे देशाला स्वराज्य मागणी पुढी आली ती महाराष्टातून. देशाला स्वराज्य मिळवुन देण्यात सर्वाधिक स्वातंत्र्य सैनिक महाराष्ट्राचे होते. ब्रिटीशांना धडा शिकविणारे महाराष्ट्रीय होते. अधिक काळ जेलची शिक्षा भोगणारे महाराष्ट्रीय होते. शहीद होणारे महाराष्ट्रीयन होते. हा इतिहास साक्ष आहे. महाराष्ट्र दिन हा महाराष्ट्र राज्याचा निर्मिती दिवस म्हणून साजरा केला जातो. १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. त्यामुळे मराठीपणाचा हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी बलिदान दिलेल्या १०६ हुतात्म्यांचे स्मरण या दिवशी केले जाते. या दिवशी ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या दिवशी राज्यात सार्वजनिक सुट्टी असते. शिवाय हा दिवस कामगार दिवस म्हणूनही साजरा केला जातो. २१ नोव्हेंबर १९५६ रोजी तत्कालीन बॉम्बेमधील (आत्ताची मुंबई) जनसमुदाय एका बाजूने चर्चगेट स्थानकाकडून आणि दुसऱ्या बाजूने बोरीबंदरकडून मोठमोठ्याने घोषणा देत, फ्लोरा फाउंटनकडे जमला. फाऊंटनच्या परिसरात तणावाचे वातावरण होते. राज्य पुनर्रचना आयोगाने महाराष्ट्राला मुंबई देण्याचे नाकारल्यामुळे मराठी माणसे प्रचंड चिडली होती. सर्वत्र छोट्या-मोठ्या सभांमधून आयोगाच्या या निर्णयाचा निषेध केला जात होता. कामगारांचा एक विशाल मोर्चा सरकारचा निषेध करण्यासाठी फ्लोरा फाऊंटनसमोरील चौकात येण्याचे ठरले. त्यानंतर प्रचंड जनसमुदाय एका बाजूने चर्चगेट स्थानकाकडून आणि दुसऱ्या बाजूने बोरीबंदरकडून गगनभेदी घोषणा देत, फ्लोरा फाऊंटनकडे जमला. मोर्चा पोलिसी ताकद वापरून उधळून लावण्यासाठी लाठीचार्ज करण्यात आला. मात्र पोलिसांचे हे प्रयत्न अयशस्वी झाले आणि मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी पोलिसांना गोळीबाराचे आदेश दिले. या गोळीबारात संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०६ आंदोलक मृत्युमुखी पडले. या हुतात्म्यांच्या बलिदानामुळे आणि मराठी माणसाच्या आंदोलनामुळे सरकारने अखेर माघार घेऊन १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केली. मुंबई सह महाराष्ट्रासाठी रक्त सांडावे लागले तेंव्हा मागणी मान्य झाली. १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाले. मात्र, महाराष्ट्र राज्य स्वतंत्र नव्हते. भारत स्वतंत्र झाला तेव्हा देशाचा नकाशा पूर्णपणे वेगळा होता. पुढे हळूहळू देशातील राज्य भाषा आणि प्रदेशाच्या आधारावर वेगळी झाली. त्यानुसार १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्यातची निर्मिती झाली. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक प्रांतीय राज्य मुंबई प्रांतात विलीन करण्यात आली. त्यावेळी मुंबई प्रांतात गुजराती आणि मराठी भाषा बोलणारे लोक राहत होते. त्यामुळे भाषावार प्रांत रचनेची मागणी जोर धरु लागली. गुजराती भाषिकांनी स्वतःचे वेगळे राज्य हवे होते. तर, मराठी भाषिक नागरिकही स्वतंत्र राज्याची मागणी करत होते. या मागणीसाठी अनेक आंदोलने झाली. या आंदोलनाचा परिणाम म्हणून १९६० मध्ये मुंबई पुनर्रचना कायद्याअंतर्गत महाराष्ट्र आणि गुजरात अशा दोन राज्यांची निर्मिती करण्यात आली. देशाची आर्थिक राजधानी मुंबई आहे. या मुंबईत अनेक कारखाने कापड मील उभा राहील्या. अनेकांच्या रोजीरोटीचा प्रश्न या मुंबईत सुटला. आर्थिक राजधानी असल्याने येथे मराठी माणसाचे वर्चस्व राहावे. यासाठी हिंदुहृद्यसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे योगदान मोठे होते. या मुंबई वर गुजरात व युपीचे लक्ष होते. नंतर बिहारी आले. मराठी माणसाचा दरारा कमी होवू लागला, मराठी माणसाठी त्यागाची भुमिका घेतली ती ठाकरे यांनी! हे विसरता येवू शकत नाही. मराठी माणूसाच्या हाताला काम देण्याचे काम मुंबई होत होते. कोणीही मुंबईत आले तरी परत गावाकडे जात नव्हता. काही तरी हाताला काम देण्याचे काम या मुंबईत होत होते. अनेक मुंबईत स्थायीक झाले. विशेष करून कोकणातील मंडळी स्थलांतरीत झाली. आजही कोकणीचे प्राबल्या अधिक दिसून येते. मोसेमारी करणारी मंडळी अधिक मुंबईत आहेत. त्याचा समुह मोठा आहे. मुंबई ही राज्याची शान आहे. त्यामुळे कोणत्याही घडामोडी मुंबईत घडल्यावर त्याचा परिणाम तातडीने दिसून येतो. सर्वाधिक कामगार हे मुंबईत आहेत. एक मे हा जागतिक कामगार दिन म्हणून पाळला जातो. या दिवशी सार्वजनिक सुट्टी असली तरी हा उत्सव साजरा केला जातो. गुजरातला जोडणारी मुंबई महाराष्ट्रीयने हाणून पाडली, मात्र आजही कर्नाटकच अन्याय महाराष्ट्रीयवर होत आहे. महाराष्ट्राची सीमा कर्नाटकापर्यंत आहे. हा सीमावर्ती भागात मराठी बोलीभाषाच्या नागरिकावर अन्याय होते. निपाणी, बेळगाव, संतपूर आदि भागात मराठी माणसावर अन्याय होतो. सीमावर्ती भागातील नागरिकांना न्याय मिळाला नाही. ही बाब केंद्राच्या हाती असल्याचे सांगतात. यासाठी मराठी माणसाने कर्नाटकी अन्याय संपावा म्हणून आंदोलने केली ती कर्नाटकाने चिरडली गेली. आजही संयुक्त महाराष्ट्र झाला नाही. आमचे बांधव कर्नाटक अन्याय, अत्याचार सहन करीत आहेत. ही बाब महाराष्ट्र दिनी दिसून येते. कधी सीमावर्ती भागाचा प्रश्न सोडविणार आहात असे या भागातील जनता विचारत आहे. जो पर्यंत कर्नाटक-महाराष्ट्र सीमावाद सुटणार नाही तो पर्यंत महाराष्ट्र संयुक्त कसा समजावा. त्यामुळे आता केंद्रात व महाराष्ट्रात भाजपाचे सरकार आहे तर कर्नाटकात काँग्रेसचे सरकार आहे. या तिघांनी मिळून हा प्रश्न सोडविला पाहिजे. महाराष्ट्र म्हटले की, छत्रपती शिवाजी राजे समोर येतात. त्याना या दिवशी स्मरण करून १०६ हुतात्म्यास अभिवादन करून सीमावाद सोडविला पाहिजे. भाषावर प्रांतरचना झाली असेल तर मराठी बोलीभाषीक कर्नाटकात राहाणे योग्य नाही. कानडीची सक्ती केली जाते. मराठी भाषांकावर कर्नाटकी अन्याय दूर करावा. या बाबत राज्याचे मुख्यमंत्री लक्ष देतील अशी आशा आहे. जागरिक कामगार दिन आजच्या दिनी साजरा होत आहे. कामगाराच्या जीवावर राज्याचा विकास आवलंबुन असतो. त्यामुळे कामगार दिना निमित्तही सर्वाना हार्दिक शुभेच्छा!

# ‘वेव्हज २०२५’ : माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या जागतिक परिवर्तनाचा प्रारंभ

देशातील माध्यम व मनोरंजन क्षेत्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण ठरणाऱ्या ‘वेव्हज २०२५’ या जागतिक परिषदेस मुंबईत भव्य सुरुवात होत आहे. १ मे रोजी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वांद्रे कुर्ला संकुल येथील जिओ वर्ल्ड सेंटर, मुंबई येथे या ऐतिहासिक परिषदेचे उद्घाटन होणार आहे. १ ते ४ मे दरम्यान होणारी ही परिषद भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली असून, माध्यम आणि मनोरंजन उद्योगाच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे.

मुंबई बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे १ ते ४ मे २०२५ या कालावधीत ‘वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट’चा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाकडे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचाही या परिषदेत सहभाग असणार आहे.

मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. विशेषतः मुंबईला हिंदी चित्रपटसृष्टीचे माहेरघर म्हटले जाते. मनोरंजनाच्या क्षेत्रात मुंबई देशात अग्रगण्य शहर आहे. गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात परकीय गुंतवणुकीतही आघाडीवर आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रात देखील महाराष्ट्र आणि मुंबई आघाडीवर राहिलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीने देखील महाराष्ट्र या देशाच्या पातळीवर अन्य देशांशी स्पर्धा करतो आहे. म्हणून पर्यटनाची सगळी स्थळे जागतिक पातळीवर जावी, हा देखील या वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट’चा उद्देश आहे. या कार्यक्रमात ३३ देशांतील मंत्री व मंत्रीस्तरीय अधिकारी, तसेच १२० आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. बॉलिवूड, टॉलीवूड, मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार व निर्मातेही कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

या चार दिवसीय सोहळ्यात भारत पॅव्हेलियन, महाराष्ट्र पॅव्हेलियन, तेलंगणा पॅव्हेलियन तसेच अन्य संस्थांचेही पॅव्हेलियन उभारण्यात येणार आहेत. त्यांचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी १ मे २०२५ रोजी करणार आहेत. विविध क्षेत्रांतील परिसंवाद, राउंड टेबल कॉन्फरन्स, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असेल. विशेषतः तिसऱ्या दिवशी म्हणजे ३ मे २०२५ रोजी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर ए. आर. रहमान यांच्या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

### महाराष्ट्र – ‘ग्लोबल क्रिएटर इकॉनॉमी’कडे वाटचाल

बॉलीवूड, टीव्ही आणि ओटीटी इंडस्ट्री यांचे केंद्रस्थान असलेली मुंबई भारताच्या मनोरंजन क्षेत्रात नेहमीच आघाडीवर राहिली आहे. आता याच मुंबईला आणि महाराष्ट्राला जागतिक स्तरावर 'क्रिएटर हब' म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न ‘वेव्हज २०२५’ च्या माध्यमातून होतो आहे. ऑस्कर, कान्स आणि दावोससारख्या जागतिक परिषदेच्या धर्तीवर प्रथमच भारतात अशी परिषद आयोजित होत असून, जगभरातील १०० पेक्षा अधिक देशांतील प्रतिनिधी यात सहभागी होणार आहेत.

### माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राला दिशा देणारा मंच

‘वेव्हज २०२५’ ही परिषद केवळ भारतातीलच नव्हे तर जागतिक माध्यम व मनोरंजन उद्योगाला एकत्र आणणारा, नवसृजनास चालना देणारा आणि गुंतवणुकीसाठी दरवाजे उघडणारा एक महत्त्वाचा मंच आहे. भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, तंत्रज्ञानातील कौशल्य आणि प्रतिभेचा संगम या परिषदेच्या केंद्रस्थानी असणार आहे.

### परिषदेतील एक विशेष आकर्षण ‘WAVES बाजार’

‘WAVES बाजार’ – एक इंटरॅक्टिव्ह व्यावसायिक व्यासपीठ असून जिथे खरेदीदार आणि विक्रेते थेट संवाद साधू शकतात. नव्या प्रकल्पांची ओळख, सर्जनशील कल्पना, आणि गुंतवणुकीच्या संधी येथे उपलब्ध होतील. विशेषतः, श्रेणीआधारित शोध प्रणाली आणि सुरक्षित मेसेजिंग सुविधांमुळे व्यवहार अधिक प्रभावी आणि विश्वासार्ह ठरतील.

### परिषदेत काय असणार?

* परिषद सत्रे – जागतिक उद्योग नेते, विचारवंत आणि नवोन्मेषक विविध विषयांवर मार्गदर्शन करतील. * मीडिया मार्केटप्लेस – भारताच्या माध्यम व मनोरंजन क्षेत्रातील वैविध्य, क्षमता आणि नवकल्पनांचे आकर्षक प्रदर्शन. * तंत्रज्ञान प्रदर्शन – नवीन तंत्रज्ञान आणि सर्जनशील प्रकल्पांचे लाईव्ह डेमो. * सांस्कृतिक कार्यक्रम – भारताच्या समृद्ध कलासंपदेची झलक दाखवणारे बहारदार कार्यक्रम.

जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पर्व ठरणारी ‘वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अ‍ॅण्ड एंटरटेनमेंट समिट (WAVES) २०२५’ भारताला जागतिक पातळीवर ‘कंटेंट सुपरपॉवर’ म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी एक सुवर्ण संधी ठरणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दृष्टिकोनानुसार भारताने क्रिएटिव्ह इकॉनॉमीमध्ये आघाडी घेत असून नेहमीप्रमाणे मुंबईने क्रिएटिव्ह इकॉनॉमीचे नेतृत्व करायला तयार आहे. ‘वेव्हज २०२५’ ही केवळ एक शिखर परिषद नाही, तर भारताच्या सर्जनशील शक्तीला, जागतिक गुंतवणुकीला आणि धोरणात्मक बदलांना चालना देणारा परिवर्तनशील क्षण आहे. भारताने याचा उपयोग करून जागतिक कंटेंट क्षेत्रावर आपला ठसा उमटवावा, अशी सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांची अपेक्षा आहे.

### ‘वेव्हज २०२५’ : का आहे ही परिषद खास?

भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन (Media Entertainment - M&E) उद्योग हा वेगाने प्रगत होत असलेला आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. OTT, ॲनिमेशन, गेमिंग, VFX, चित्रपट, संगीत, आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात भारताने गेल्या दशकात विक्रमी प्रगती केली आहे. FICCI-EY रिपोर्टनुसार, २०२४ मध्ये भारतीय माध्यम आणि मनोरंजन उद्योगाची किंमत २८ अब्जच्या पुढे गेली असून, २०२५ पर्यंत तो ३४ अब्ज गाठेल असा अंदाज आहे. याच पार्श्वभूमीवर ‘वेव्हज २०२५’ ही परिषद केवळ चर्चासत्रांचे व्यासपीठ नसून, भारतातील सृजनशील उद्योगक्षेत्राला जगभरातील गुंतवणूक, सहकार्य, आणि नवकल्पनांशी जोडणारा सेतू ठरणार आहे.

### भारत – सृजनशील महासत्ता होण्याच्या वाटेवर

भारतात सध्या दरवर्षी २,००० पेक्षा अधिक चित्रपट तयार होतात, ज्यात २० पेक्षा अधिक प्रादेशिक भाषा समाविष्ट असतात. जढढ प्लॅटफॉर्मवर भारतीय कंटेंटची मागणी केवळ देशातच नव्हे तर अमेरिका, युरोप, मिडल ईस्ट आणि दक्षिण आशियाई देशांमध्येही वाढत आहे. या मागणीचा फायदा घेत, भारताने ‘कंटेंट एक्स्पोर्ट हब’ होण्यासाठी पावले उचलणे ही काळाची गरज बनली आहे. WAVES २०२५ या दिशेने एक निर्णायक टप्पा ठरेल. ही परिषद केवळ संवादाचा नव्हे, तर कृतीशील धोरणनिर्मितीचा केंद्रबिंदू ठरेल, जिथून भारताची माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील भविष्यातील दिशा ठरवली जाईल.

### ऑस्कर, कान्स, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, दावोसच्या धर्तीवर वेव्हज् चेही दरवर्षी आयोजन

‘वेव्हज’ ही परिषद केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्याने होत आहे. वेव्हजला कायमस्वरूपी एक सचिवालय स्वरूपात पुढे नेण्यात येणार आहे. या परिषदेस एक कायमस्वरूप देऊन दरवर्षी हा कार्यक्रम घेतला जाणार आहे. ज्याप्रमाणे ऑस्कर, कान्स किंवा दावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम सारखा आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयोजन केले जाते, अगदी त्याचप्रमाणे वेव्हज याचेही दरवर्षी आयोजन केले जाणार आहे. यासाठी एक समर्पित टीम वर्षभर काम करणार आहे.

### वेव्हज परिषदेस १०० पेक्षा जास्त देश होणार सहभागी

सध्या तंत्रज्ञानाचे युग असून ते बदलणारे आहे. या नवीन बदलत्या तंत्रज्ञानाचे नेतृत्व महाराष्ट्राने करावे, यावर जोर देण्यात येत आहे. दृकश्राव्य तसेच मनोरंजन क्षेत्रात क्रियेटिव्ह इॅकॉनॉमीला एक प्लॅटफॉर्म देण्यात येणार आहे. मुंबई येथे होणाऱ्या या वेव्हज परिषदेस १०० पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम यापूर्वी झालेल्या जी २० पेक्षा खूप मोठा असणार आहे.

### वेव्हज समिटची वैशिष्ट्ये आणि महत्त्वाचे घटक:

‘क्रिएट इन इंडिया’ वर भर: मेक इन इंडिया’ पाठोपाठ आता ‘क्रिएट इन इंडिया’ ही नवी संकल्पना WAVES समिटद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढे नेली जाईल.

सर्जनशील प्रतिभेला व्यासपीठ: भारतातील प्रादेशिक भाषांतील कंटेंट, ॲनिमेशन आणि गेमिंग क्षेत्रातील नवोदित निर्माते आणि कलाकारांना जागतिक प्लॅटफॉर्मवर आपली कला सादर करण्याची संधी.

ग्लोबल सहयोग आणि भागीदारी: Netflix, Amazon, Disney+, Sony Pictures यांसारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत भागीदारीसाठी मार्ग मोकळे होतील.

तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांचा संगम: एआय, वर्च्युअल प्रोडक्शन, आणि इंटरॅक्टिव कंटेंटसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर सखोल चर्चा.

धोरणात्मक चर्चासत्रे: धोरणकर्ते, गुंतवणूकदार, कलाकार, तंत्रज्ञ आणि उद्योगपती यांच्यात थेट संवादाची संधी.

क्रिएट इन इंडिया चॅलेंज – जगभरातील नवोदित निर्मात्यांच्या प्रतिभेचा अविष्कार साजरा करणारा एक अभूतपूर्व उपक्रम, अर्थात मुंबईत होणाऱ्या वेव्हज २०२५ मध्ये आपल्या प्रतिभेची झलक दाखवण्यासाठी ‘वेव्हज’ हे एक आघाडीचे व्यासपीठ म्हणून सज्ज आहे.

वेव्हेक्स २०२५ – हा उपक्रम एक मैलाचा दगड ठरणार असून यामाध्यमातून मीडिया-टेक स्टार्टअप्स त्यांच्या नवकल्पना आघाडीच्या उद्योग धुरिणांसमोर आणि सेलिब्रिटी एंजल गुंतवणूकदारांसमोर सादर करतील, ज्यामुळे भारताच्या माध्यम आणि मनोरंजन परिसंस्थेच्या भविष्याला नवीन दिशा मिळेल.

वेव्हज बाजार: चित्रपट, गेमिंग, संगीत, जाहिरात आणि एक्सआर, निर्माते, गुंतवणूकदार आणि इतर व्यवसायांना जोडणारी एक अद्वितीय जागतिक बाजारपेठ. यातूनच उद्योग व्यावसायिकांना उत्पन्नाचे नवीन स्रोत उघडण्याच्या संधी देखील देते.

मास्टरक्लासेस आणि परस्परसंवादी सत्रे – उद्योगातील दिग्गज आणि जागतिक नेत्यांकडून शिकण्याची, माध्यम, मनोरंजन आणि तंत्रज्ञानाच्या भविष्याबद्दल अंतर्दृष्टी मिळविण्याची एक दुर्मिळ संधी.

# ‘जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा’

## महाराष्ट्र दिन: गौरवशाली इतिहासाचा आणि समृद्ध संस्कृतीचा उत्सव

*१ मे! केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख नव्हे, तर प्रत्येक मराठी माणसाच्या मनात धगधगणारी अस्मितेची ज्योत आहे. हा दिवस आहे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा, एका स्वप्नाच्या साकारण्याचा. महाराष्ट्र दिन म्हणजे आपल्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण, आपल्या समृद्ध संस्कृतीचा उत्सव आणि आपल्या एकतेचा हुंकार! याच भावनेतून साकारलेल्या महाराष्ट्राच्या गौरवगाथेचा हा आलेख...*

लेखक
राहूल हरिभाऊ डूंगळे-पाटील
रा.करकट्टा ता.जि.लातूर
मोबाईल ९८९०५७७१२८

महाराष्ट्र दिन, म्हणजेच १ मे! हा केवळ एक शासकीय सुट्टीचा दिवस नाही, तर कोट्यवधी मराठी भाषिकांच्या अस्मितेचा, संघर्षाचा आणि गौरवशाली इतिहासाचा उत्सव आहे. याच दिवशी, १ मे १९६० रोजी, संयुक्त महाराष्ट्राच्या स्वप्नाने मूर्त रूप घेतले आणि मुंबईसह मराठी भाषिक लोकांचे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले. या दिवसाच्या स्मरणार्थ आणि महाराष्ट्राच्या समृद्ध वारशाचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.

सन १९५६ च्या राज्य पुनर्रचना कायद्यानुसार जेव्हा भाषिक आधारावर राज्यांची निर्मिती झाली, तेव्हा मराठी भाषिक प्रदेश वेगवेगळ्या प्रशासकीय विभागांमध्ये विभागलेला होता. मुंबईमध्ये मराठी, गुजराती, कच्छी आणि कोकणी भाषिक लोक एकत्र राहत होते. मराठी भाषिकांच्या मनात आपल्या स्वतंत्र राज्याची तीव्र इच्छा होती आणि याच भावनेतून ‘संयुक्त महाराष्ट्र समिती’ चा जन्म झाला. या समितीने मुंबईसह संपूर्ण मराठी भाषिक प्रदेशाला एकत्र आणण्यासाठी एक मोठी चळवळ उभी केली.

या चळवळीत अनेक लोक एकत्र आले. एस.एम. जोशी, आचार्य प्र.के. अत्रे, कॉ. श्रीपाद अमृत डांगे, सेनापती बापट आणि प्रबोधनकार ठाकरे यांसारख्या अनेक नेत्यांनी आपल्या वाणी आणि लेखणीतून मराठी जनतेला एकत्र केले. या संघर्षात अनेक कार्यकर्त्यांनी त्याग आणि बलिदान दिले. २१ नोव्हेंबर १९५६ रोजी फ्लोरा फाउंटन येथे झालेल्या गोळीबारात १०६ आंदोलकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. या हुतात्म्यांच्या बलिदानाला आणि मराठी माणसाच्या जिद्दीला अखेर यश आले आणि १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते या नव्या राज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली.

महाराष्ट्र हा केवळ एक भौगोलिक प्रदेश नाही, तर तो एका महान संस्कृतीचा वारसा आहे. या मातीने छत्रपती शिवाजी महाराजांसारखे पराक्रमी योद्धे आणि सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महान समाजसुधारकांना जन्म दिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वधर्मसमभावाचे हिंदवी स्वराज्य स्थापन केले, जे आजही आपल्यासाठी प्रेरणास्रोत आहे. तर संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव आणि संत एकनाथांसारख्या संतांनी आपल्या अभंगांनी आणि शिकवणींनी समाजाला प्रेम, भक्ती आणि मानवतेचा मार्ग दाखवला. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व समाजात रुजवले आणि स्त्रियांच्या उद्धारासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील दुर्बळ घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष केला आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार ठरले.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात विविधता आणि सौंदर्य यांचा संगम आढळतो. गणेश चतुर्थी, दिवाळी, होळी, ईद, नाताळ यांसारख्या सणांना येथे विशेष महत्त्व आहे. पंढरपूरची वारी लाखो भाविकांची श्रद्धा आणि एकतेचे प्रतीक आहे. लावणी, पोवाडा, तमाशा यांसारख्या लोककला महाराष्ट्राची खास ओळख आहेत, ज्या आजही लोकांचे मनोरंजन करतात आणि सामाजिक संदेश देतात. मराठी साहित्यही खूप समृद्ध आहे. संत ज्ञानेश्वरांच्या ‘ज्ञानेश्वरी’ पासून ते वि. वा. शिरवाडकर, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, पु. ल. देशपांडे आणि अनेक समकालीन लेखकांच्या मराठी साहित्याने नेहमीच जीवनातील विविध रंगांना आणि अनुभवांना शब्दबद्ध केले आहे. ‘माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा’ या कुसुमाग्रजांच्या शब्दांत महाराष्ट्राच्या मातीचा गौरव आणि स्वाभिमान व्यक्त होतो.

महाराष्ट्र दिनाच्या दिवशी राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शाळा, महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांमध्ये ध्वजारोहण होते. मुंबईतील शिवाजी पार्क येथे भव्य परेड आयोजित केली जाते, राज्याचे राज्यपाल, पोलीस दल आणि इतर शासकीय कर्मचारी सहभागी तेथे होतात. महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपरा दर्शवणारे अनेक सांस्कृतिक कार्यक्रम यानिमित्ताने आयोजित केले जातात. हुतात्मा स्मारकावर शहीदांना आदरांजली वाहिली जाते आणि राज्याच्या विकासात योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सत्कार केला जातो.

आज महाराष्ट्र साहित्य, कला, शिक्षण, उद्योग, तंत्रज्ञान आणि विज्ञान अशा अनेक क्षेत्रांमध्ये अग्रेसर आहे. आपल्या समृद्ध इतिहासाचा आणि सांस्कृतिक वारसाचा मान राखत, महाराष्ट्र प्रगतीच्या मार्गावर वेगाने पुढे वाटचाल करत आहे. महाराष्ट्र दिन हा केवळ भूतकाळाचे स्मरण करण्याचा दिवस नाही, तर भविष्यातील प्रगतीसाठी प्रेरणा घेण्याचा आणि एकजुटीने काम करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. ‘जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा’ या गर्जनेने आज प्रत्येक मराठी माणसाचे हृदय अभिमानाने भरून येते आणि या राज्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी सज्ज होण्याची प्रेरणा मिळते.

# विश्वेश्वरय्याच्या स्थापत्य अभियांत्रिकी अंतीम वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप

औसा/प्रतिनिधीः- तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील अंतीम वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ विश्वेश्वर शैक्षणिक संकुलातील सांस्कृतीक सभागृहात पार पडला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणुन विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, प्रमुख पाहुणे गणेश पंडित, असिस्टंट इंजिनीअर, सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभागीय कार्यालय, धारूर, पांडुरंग झोले, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, ठाणे, अभिषेक साळुंके, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, लातूर, वैष्णवी पाटील, कनिष्ठ अभियंता, जलसंधारण विभाग, लातूर, राजश्री उदाते, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, लातूर, अभिषेक बगळे, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापुर, स्वप्नजा म्हेत्रे, कनिष्ठ अभियंता, जलसंधारण, उपविभाग, कंधार, विक्रमसिंग देशमुख, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, लातूर, अक्षय काळे, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, धाराशिव, विभागप्रमुख प्रा. प्रविण साबदे, प्रा. रेवणसिध्द बुक्का यांच्या उपस्थितीत पार पडला.

# काळे अक्रोड आहे आरोग्याचा खजिना

अक्रोड मानवी मेंदूच्या आकारात दिसतो, ज्यामुळे त्याच्या सेवनाने अनेक प्रकारच्या शारीरिक समस्यांपासून दूर राहण्यास मदत होते. त्यात सर्वाधिक ओमेगा-३ फॅटी ॲसिड असते.काळा अक्रोड हे बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ आहे.काजू, बदाम, बेदाणे तसेच अक्रोड खाणे देखील आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. अक्रोड मानवी मेंदूच्या आकारात दिसतो, ज्यामुळे त्याच्या सेवनाने अनेक प्रकारच्या शारीरिक समस्यांपासून दूर राहण्यास मदत होते. त्यात सर्वाधिक ओमेगा-३ फॅटी ॲसिड असते. याशिवाय अक्रोडमध्ये ऊर्जा, फायबर, अँटिऑक्सिडंट्स, पोटॅशियम, प्रोटीन, मेलाटोनिन, कार्बोहायड्रेट्स, कॅल्शियम, लोह, फॉस्फरस यांसारखे पोषक घटक असतात. तसेच अक्रोड कुकीज, केक, पुडिंग, मिठाई, एनर्जी बार, गोड मिठाई, इत्यादींमध्ये वापरले जाऊ शकते. तुम्ही तपकिरी अक्रोड खूप खाल्ले आहे, पण तुम्हाला माहित आहे का की काळे अक्रोड देखील आहेत. होय, काळे अक्रोड, बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ, अँटिऑक्सिडेंट संयुगे, आरोग्यास अनेक प्रकारे फायदेशीर ठरतो.काळ्या अक्रोड मध्ये असलेले पोषक घटकवरिष्ठ आहारतज्ज्ञ व तसेच इंडियन स्पाइनल इंज्युरीजच्या हिमांशी शर्मा यांच्या नुसार काळ्या अक्रोडात अँटिऑक्सिडंट्स, अँटी-इंफ्लेमेटरी, अँटी-फंगल गुणधर्म असतात. यासोबतच प्रथिने, फायबर, मिनरल्स, जीवनसत्त्वे यांचाही हा मुख्य स्रोत आहे. काळे अक्रोड खाण्याचे फायदे व नुकसान

आहारतज्ज्ञ हिमांशी शर्मा यांच्या मते काळे अक्रोड मर्यादित प्रमाणात खाल्ल्याने लो डेन्सिटी लिपोप्रोटीन किंवा खराब कोलेस्ट्रॉल कमी होते. उच्च रक्तदाबाची समस्या असलेल्या लोकांनी काळे अक्रोड खावे.

काळ्या अक्रोडचे नियमित व प्रमाणात सेवन केल्यास जळजळ होण्याची समस्या कमी होऊ शकते.

भूक लागल्यास काळे अक्रोड खा, कारण त्यात फायबरचे प्रमाणात जास्त असते. त्यामुळे तुमचे वजन नियंत्रणात राहण्यास मदत होऊ शकते.काळ्या अक्रोडमध्ये असलेले अँटी-फंगल, अँटीऑक्सिडंट गुणधर्म देखील रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात.

काळे अक्रोड कर्करोग, हृदयरोग, पीसीओडी, यकृत रोग इत्यादींपासून देखील संरक्षण करू शकते. दरम्यान काळ्या अक्रोडाच्या फायद्यांबरोबरच काही नुकसान देखील आहेत, जसे की जास्त प्रमाणात सेवन केल्याने एलर्जीची प्रतिक्रिया होऊ शकते. प्रत्येकाला सारखीच ॲलर्जी होईल असे नाही.काळ्या अक्रोडमध्ये असलेले टॅनिन पोटाच्या विकारांसाठी अँटीकोआगुलंट्स किंवा विशिष्ट औषधांमध्ये व्यत्यय आणू शकतात.जर तुम्हाला काळ्या अक्रोडाचे सेवन करायचे असेल तर पोषणतज्ञ, तज्ञांचा सल्ला घेणे महत्वाचे आहे.अक्रोड खाण्याचे फायदे-अक्रोडाचे सेवन केल्यास चांगले कोलेस्ट्रॉल वाढते. अक्रोडमध्ये असलेले ओमेगा-३ फॅटी ॲसिड, अँटीऑक्सिडंट्स मेंदूच्या आरोग्यासाठी योग्य आहेत. स्मरणशक्ती आणि विचार करण्याची क्षमता सुधारते. मुलांची स्मरणशक्ती वाढते. फॉलेट, व्हिटॅमिन बी ९ च्या उपस्थितीमुळे, गर्भवती महिलांच्या शरीरात फॉलिक ॲसिडची कमतरता नसते. यामध्ये असलेले उच्च फायबर आणि कमी ग्लायसेमिक इंडेक्स देखील मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर ठरू शकतात. अँटिऑक्सिडंट्स, पोटॅशियम, ओमेगा-३ त्वचा आणि केस निरोगी ठेवतात. फायबर असल्यामुळे अक्रोड बद्धकोष्ठता दूर करते, पचनसंस्था निरोगी ठेवते. उच्च रक्तदाबाची समस्या असलेल्या लोकांसाठी अक्रोड हा एक चांगला पर्याय आहे, यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो.



# कामगारांना योग्य न्याय मिळाला पाहिजे.





कामगारवर्ग हा भारताचाच नाही तर संपूर्णजगाचा आधारस्तंभ आहे,परंतु तो दिवसेंदिवस ढासळतांना दिसत आहे.दरवर्षी १ मे हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय कामगार दिवस म्हणुन साजरा केल्या जातो.आज जगाचा विचार केला तर ८० टक्के लोक कामगारांमध्ये मोडतात यात अनेक क्षेत्रातील कामगार वर्ग दिसुन येतात.शेतीतील कामगार असो, कारखाण्यातील कामगार असो किंवा इतर कोणत्याही क्षेत्रातील कामगार असो त्याची अत्यंत दयनाअवस्था दिसून येते. आज विकसीत, विकसनशील,गरीब या संपूर्ण देशातील कामगारांवर जिवन-मरणाचा प्रश्न उद्भवत आहे.आज भारताचा विचार केला तर सध्याच्या परिस्थितीत लोकसंख्येच्या बाबतीत स्फोटक आकडा दिसून येतो.भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेल्याचे युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडच्या आकडेवारी नुसार दिसून येते.म्हणजेच चीनच्या लोकसंख्येपेक्षा २९ लाखाने जास्त असुन जगात प्रथम क्रमांकावर आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत सरकार व राजकीय पुढाऱ्यांनी कामगारांची सर्वोतोपरी मदत करण्याची नितांत गरज आहे. आपल्या देशाचा विचार केला तर मुठभर राजकीय पुढाऱ्यांजवळ अरबो-खरबो रूपयांची चल-अचल संपत्ती आहे ही संपत्ती राजकीय पुढाऱ्यांनी कामगारांच्या प्रती उपयोगात आणली तर एक मदतीचा हात समजल्या जाईल. कामगार जगाचा शिल्पकारमानल्या जातो. तर शेतकरी हा अन्नदाता मानल्या जातो.यांची भुमिका देशासाठी व जगासाठी महत्त्वाची असते. आज मंदिर-मज्जीद, कारखाने, सरकारी इमारती,ताजमहाल, गुरूद्वारा, बौद्ध विहार,कुतुबमिनार,संसद भवन, अयोध्येतील राममंदिर मोठ-मोठी गडकील्ले जे आपण पहात आहोत ते संपूर्ण कामगारांच्या मदतीने बनवीण्यात आले. परंतु आज शिल्पकारचे हाल-बेहाल होत असल्याचे दिसून येते.कामगार हा जगाचा मोठा आधारस्तंभ आहे. कामगार नाही तर काहीच नाही. हीबाब भारतासह जगाने लक्षात ठेवली पाहिजे. कामगारवर्गामध्ये अशा अनेक अडचणी दीसुन येतात की त्यांचा उदरनिर्वाह होने अत्यंत कठीण झाले आहे.आपण जर भारतातील ईपीएस-९५च्या दिड करोड निवृत्त पेंशन धारकांचा विचार केला तर त्यांना १००० ते ३००० रूपयांपर्यंत पेन्शन मिळत आहे.पेंशन वाढण्याच्या आशेने निवृत्त पेंशन धारक मोठ्या आशेने सरकारकडे पहात होते.परंतु केंद्र सरकारने त्यांच्या मागणीकडे पाठ फिरविल्याचे दिसून येते.अल्पशा पेंशनमध्ये त्यांचा उदरनिर्वाह व औषधोपचार होवु शकत नाही. त्यामुळे त्यांच्यापुढे आजही जिवन-मरनाचा प्रश्न उपस्थित आहे. असंघटीत कामगारांचा विचार केला तर त्यांची परीस्थिती आनखीनच कठीण व भयावह आहे. त्यामुळे भारतासह जगात आजच्या परिस्थितीत कामगारवर्ग अत्यंत दु:खी आणि चिंतेत दीसुन येतो. २०१९ ते २०२१ हे वर्ष संपुर्ण जगासाठी महामारीने जखडलेले वर्ष ठरले. आजही शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती आहेच त्याच्या दुप्पटीने कामगारांची गंभीर परिस्थिती दिसून येते.भारत हा शेतीप्रधान देश आहे त्याचप्रमाणे बहु लोकसंख्येचा देश आहे. कामगार वर्ग मेहनतीने देशाच्या विकासासाठी व इतर कामांसाठी हातभार लावतो परंतु त्या कामाचा मोबदला तुटपुंजा मिळतो. त्यामुळे आता समान कायदा, समान अधिकार समान संपत्ती, समान वेतन,समान पेंशन यावर विचार करण्याची वेळ आलेली आहे. एका कुटुंबाला रहाण्याकरीता कीती जागा असावी,एका कुटुंबाजवळ उदरनिर्वाह करण्याकरिता कीती संपत्ती असावी. यावर माननीय प्रधानमंत्री, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, सुप्रिमकोर्ट, हायकोर्ट यांना विचार करण्याची वेळ आली आहे.कारण ही दु:खदायीबाब आहे की ज्यांना आपण लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, समाजसेवक म्हणतो अशा आजि-माजी राजकीय पुढाऱ्यांच्या संपत्तीचा विचार केला तर यांच्याजवळ आज अरबो-खरबो रूपयांची चल-अचल संपत्ती दीसून येईल. म्हणजेच राजकीय पुढारी तुपाशी आणि कामगार उपाशी अशी परिस्थिती आज भारतात सर्वत्र दिसून येते. यामुळेच देशात महागाई, बेरोजगारी, शिक्षणाचा अवाढव्य खर्च, आरोग्य सुविधा इत्यादीसह अनेक ज्वलंत समस्यांनी जन्म घेतला आहे राजकिय पुढारी नेहमी समान अधिकाराची भाषा करतात परंतु ही सर्व राजकीय खेळी असते ही बाब सर्वांनाच लक्षात आहे. त्यामुळे करोना काळात झालेले नुकसान व जगातील सध्याची युद्धजन्य परिस्थिती पहाता आणि पुढे येणारी समस्या पहाता समान अधिकार, समान वेतन, समान संपत्ती यावर चर्चा करून नवीन कायदा सरकारने अमलात आणायला हवा. तेव्हाच कामगारवर्ग व गरीब वर्गाला दीलासा मिळेल अन्यथा श्रीमंत हा श्रीमंत होत जाईल व गरीब हा गरीबीच्या खाईत गुदमरून मरेल.करीता गरीब वर्ग व कामगार वर्ग यांच्या प्रती गांभीर्य बाळगून सरकारने कडक नियमावली आखली पाहिजे. तेव्हाच कामगार वर्ग सुखाने जगेल व योग्य न्याय प्राप्त होईल. भारत सरकारने कामगार दिनाचे औचित्य साधून कामगारांच्या प्रती मोठे पाऊल उचलण्याची गरज आहे. देशातील दिड करोड ईपीएस-१९९५ पेंशन धारकांचा प्रश्न अजुनही रडखडलेला आहे. त्यावरसुध्दा भारत सरकारने गांभीर्याने विचार करून अंतिम निर्णय घ्यायला हवा. पेंशनधारकांची एकच मागणी आहे की कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व आरोग्य सुविधा मिळावी.एवढे कार्य सरकारने केले तर ईपीएस-९५ चा पेन्शन धारक धन्य होईल.परंतु सरकार व ईपीएफओ पळवाटा काढतांना दिसतात.सरकारने कामगारांच्या जखमेवर फुंकर घालावी. यालाच खरा कामगार दिवस समजल्या जाईल. कारण ज्या देशाचा कामगार सुखी तो देश सुखी हे ही तितकेच सत्य आहे.सध्याच्या परीस्थितीत कामगार चळवळी संपुष्टात आल्या आहेत.त्यामुळे सरकारच कामगारांचे सर्वेसर्वा आहेत.अशा परीस्थितीत सरकारनेच कामगारांच्या प्रती योग्य पाउले उचलुन दिलासा दिला पाहिजे. कारण भारतातीलच नाही तर संपूर्ण जगातील कामगार वर्ग अत्यंत संवेदनशील आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यकुशलतेचा मोबदला त्यांना मिळायलाच पाहिजे.कारण कामगार हा जगाचा आधारस्तंभआहे.या आधारस्तंभाला टिकवुन ठेवण्याची जबाबदारी भारतासह संपूर्ण जगाची आहे.कामगारांच्या प्रती सहानुभूती,सहकार्याची भावना सरकारने व भांडवलशाही वर्गाने अंगीकारली पाहिजे. यातच खऱ्या अर्थाने कामगार दिवसाची प्रतीमा दिसून येईल.देशाचा राजकीय पुढारी कामगार दिनाच्या निमित्ताने कामगारांना योग्य न्याय देण्याचे वचन देत असेल व त्यांच्या प्रती आदर ठेवत असेल तरच याला खऱ्या अर्थाने कामगार दिवस समजल्या जाईल. जगातील बदलते हवामान पहाता कामगार दिनाचे औचित्य साधून भारतासह जगातील देशांनी या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून कामगार दिवस साजरा करावा.यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहील.जय हिंद!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार.
( स्वतंत्र पत्रकार) मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## डॉक्टर टीप्स

### पुरुषांमध्ये सेक्स इच्छा कमी असण्याचे हे ३ कारण जाणून घ्या...





प्रणयक्रिडा हा प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्वाचा घटक असतो. यामुळे शरीर निरोगी राहण्यास मदत होते. तसेच मानसिक संतुलनही उत्तम राहते. पण, काही पुरूषांना ही इच्छा कमी असते. यामागे अनेक कारणे आहेत. या कारणांमुळेच पुरुषांना सेक्सचा आनंद लुटता येत नाही. याचे मुख्य कारण खाली देण्यात येत आहे.

**३) मांसपेशी कमकुवत असणे**

प्रणयाची इच्छा कमी होण्याचे आणखी एक मुख्य कारण म्हणजे डिस्फंक्शन म्हणजेच पुरूषाच्या गुप्तांगामधील मांसपेशी कमजोर असणे. मुख्यता या समस्येचा सामना व्हिटॅमिन सीच्या कमरतेमुळे, सिगरेटचे सेवन तसेच अल्कोहोलच्या सेवनामुळे होवू शकते. अनेक वेळा अति ताणामुळे देखील मांसपेशी कमजोर पडू शकतात. व्हिटॅमिन बी युक्त पदार्थांच्या कमरतेमुळे अनेक पुरूषांची प्रणयाची इच्छा कमी होते. आहारामध्ये व्हिटॅमिन बी युक्त पदार्थांचे सेवन वाढवल्यास ही समस्या दूर होते.

## विनोद




एक बाई शेजारणीच्या नवऱ्यास म्हणाली, 'तुम्ही आमच्या ह्यांना दारू प्यायला शिकवले नाही तर आमच्या ह्यांना सुपारीच्या खांडाचेसुद्धा व्यसन माहीत नव्हते' त्यावर त्या शेजारच्या बाईचा नवरा शांतपणे म्हणाला, 'बाई तुमचे म्हणणे खरं आहे. पण त्याला मी काय करणार? मला एकच गोष्ट माहीत आहे आणि ती म्हणजे जे जे आपणासी ठावे, ते ते दुसऱ्यासी शिकवावे.

## संदेश

jawani ke din chamkile ho gaye,
husn ke tevar nukeele ho gaye,
hum ijhar karne me thode dhele ho gaye,
aur udhar unke hath peele ho gaye!.

## सुविचार

स्वतंत्र असावे पण स्वै नसावे.


**संस्कृत सुभाषित**

**दृष्टिपूतं न्यसेत् पादं, वस्त्रपूत पिबेज्जलम्।।**
**सत्यपूतां वदेद् वाचं, मनःपूतं समाचरेत्।।**

अर्थः-नीट पाहूनच जमिनीवर पाऊल ठेवावे, पाणी नेहमी वस्त्रातून गाळून घ्यावे, सत्याने पवित्र झालेले वचन बोलावे, मनाला जे पवित्र आणि सत्य वाटेल तसे वर्तन करावे.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र.९



## आडवे शब्द

१. प्राचीन, जुने
४. चूकच्या विरुद्ध, सह
८. धुंदी
९. सन्मानाने केलेली पाठवणी
१०. पायापर्यंत लोंबणारा हार
१४. पद्धतीनुसार
१६. धनुष्याकृती
१७. उलटी, ओकारी
२०. हा अगरबत्तीचा असतो आणि पदार्थांतही
२१. संधी, मोका
२२. कमीत कमी, निदान
२५. खिसा गरम ठेवणाऱ्या
२६. गोरा ना काळा!
२७. धडक
२८. छोटी, लहानशी
३२. समोरासमोर
३५. शेवटचा पांडव
३८. स्वयंपाक करणारा
३९. मज्जाव
४०. भरभराट
४२. आवाज, गोंगाट
४३. छोटी विश्रांती
४४. समुदाय
४६. मजबूत, भक्कम
४८. आश्रय
४९. दुलई
५०. पराधीन असणारा जीव
५२. पदर
५४. पद्धत
५५. अभिनेता
५७. केसात माळण्याची फुलांची माळ
५९. आघात, घाव
६०. सुसर
६२. तपस्या
६४. नुकसान, घाटा
६६. शिक्षक
६७. सूर्याचे एक नाव
६८. अवघा
६९. छिद्रातून पडलेला उन्हाचा किरण
७१. पळसाचा डिंक
७३. आपले राष्ट्रगीत
७५. आणि
७६. इंग्रजीतला मुरांबा, मराठीत खूपच
७७. शेवट,७८. हार, सर
७९. नम्र

## उभे शब्द

१. पूजाअर्चा करणारा
२. एक हिंस्र प्राणी
३. बाज विणण्याची कापडी पट्टी
४. उद्यान, बाग
५. वस्तूंची यादी
६. झाडाची त्वचा
७. मालक, स्वामी
८. मऊ
११. स्वाभिमानी, बाणेदार
१२. भोजनालय
१३. अधाशी
१५. घोड्याचे घर
१६. आईसक्रीमचा एक प्रकार
१९. कापसाची बी
२०. मनातील इच्छा, आकांक्षा
२१. बोकड
२२. इंग्रजीत फाटक
२३. वडीलांचे मराठी संबोधन
२४. शत्रुच्या नाशाचे मंत्रतंत्र
२९. जेमतेम
३०. विशेष
३१. अरण्य
३२. विधिमंडळातील लोकप्रतिनिधी
३३. गजऱ्यातील सुगंधी वनस्पती
३४. प्रामाणिक
३६. मावळ्यांची युद्धातील घोषणा
३७. परमेश्वर
३८. जनगणना
४१. पसरट आकाराचे भांडे
४३. भव्य, प्रचंड
४५. खराब
४६. मीठी
४७. कोर्टातील दावा
५१. नम्रतेने मान खाली घालणे
५२. शिकार
५३. लोकनाट्य
५५. हात
५६. व्याकूळ, घाबरलेला
५८. उजाडण्यापूर्वीच
६१. उष्ण
६३. प्रसिद्ध
६५. चंद्रावर 'दिसणारा' प्राणी
६७. ठराविक पैसे
६८. माल, वस्तू
६९. पंकज
७०. टिमकी
७२. निरोप, सुट्टी
७४. लक्ष्मीचे एक नाव

## आडवे उत्तरे

१.पुरातन ४.बरोबर ८.नशा ९.रवानगी १०.कमलखानी हार १४.रीतसर १६.कमान १७.वमन २०.मसाला २१.अवसर २२.गोलबाजार २५.नोटा २६.उजळ २७.टक्कर २८.बारकी ३२.आमनेसामने ३५.सहदेव ३८.खानसामा ३९.मना ४०.बरकत ४२.रव ४३.विसावा ४४.समूह ४६.कणखर ४८.थारा ४९.रजई ५०.मानव ५२.पालव ५४.रीत ५५.कलाकार ५७.गजरा ५९.प्रहार ६०.मगर ६२.साधना ६४.तोटा ६६.मास्तर ६७.रवि ६८.सारा ६९.कवडसा ७१.कमरकस ७३.वंदेमातरम ७५.व ७६.जाम ७७.अंत ७८.माळ ७९.लीन

## उभे उत्तरे

१.पुजारी २.तरस ३.नवार ४.बगीचा ५.रकमाला ६.साल ७.धनी ८.नरम ११.मानी १२.खानावळ १३.हावरट १५.तबेला १६.कसाटा १९.सरकी २०.मनोकामना २१.अज २२.गेट २३.बाबा २४.जारणमारण २९.कसाबसा ३०.खास ३१.रान ३२.आमदार ३३.मरवा ३४.नेक ३६.हरहर महादेव ३७.देव ३८.खानेसुमारी ४१.तसराळे ४३.विशाल ४५.वाईट ४६.कव ४७.खटला ५१.नतमस्तक ५२.पारध ५३.वग ५५.कर ५६.कासविस ५८.रातोरात ६१.गरम ६३.नामवंत ६५.ससा ६७.रकम ६८.सामान ६९.कमळ ७०.डफली ७२.रजा ७४.रमा




## थोडक्यात/ संक्षिप्त

### गुजरातला दणका दिल्यानंतर वैभव सूर्यवंशीला मिळाले मोठे गिफ्ट

मुंबई-आयपीएल २०२५ चा ४७ वा सामना राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात खेळला गेला. हा सामना आयपीएलच्या इतिहासातील सर्वात संस्मरणीय ठरला, कारण यामध्ये १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने वर्ल्ड क्रिकेटमध्ये आपल्या असा पराक्रम केला आहे की ज्यावर विश्वास ठेवणे खूप कठीण आहे.
सूर्यवंशीने गुजरात टायटन्सच्या गोलंदाजांना चकवा देत फक्त ३५ चेंडूत शतक झळकावले. अशाप्रकारे, तो आयपीएल तसेच टी-२० स्वरूपात शतक करणारा सर्वात तरुण फलंदाज बनला.
याशिवाय, त्याने आयपीएलमध्ये एक भारतीय म्हणून सर्वात जलद शतक करण्याचा विक्रमही केला. सूर्यवंशीची आता सर्वत्र चर्चा होत आहे आणि त्यांच्या कामगिरीवर खूश होऊन बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही मोठी बक्षीस रक्कम जाहीर केली आहे. वैभव सूर्यवंशी हा बिहारचा आहे आणि त्याने खूप कमी वेळात रेकॉर्ड बुकमध्ये आपले नाव नोंदवले आहे. गुजरात टायटन्सने राजस्थान रॉयल्ससमोर २१० धावांचे लक्ष्य ठेवले होते, परंतु सूर्यवंशीच्या ३८ चेंडूत नाबाद १०१ धावांच्या खेळीमुळे आरआरने केवळ १५.५ षटकांत हे लक्ष्य गाठले, जे आयपीएलमधील कोणत्याही संघाकडून २०० पेक्षा जास्त धावांचे सर्वात जलद लक्ष्य गाठण्याचा विक्रम आहे.
नितीश कुमार यांनी ट्विट करत केले कौतुक...
बिहारच्या पोराच्या या विक्रमी खेळीनंतर मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी सोशल मीडिया अकाउंटवरून वैभव सूर्यवंशीचे कौतुक करणारे ट्विट केले आणि १० लाख रुपयांचे बक्षीसही जाहीर केले. ट्विटमध्ये लिहिले आहे की, ''आयपीएलच्या इतिहासात शतक करणारा सर्वात तरुण खेळाडू (१४ वर्षे) ठरलेला बिहारचा वैभव सूर्यवंशी यांचे अभिनंदन. सर्वांना त्याचा अभिमान आहे. मी २०२४ मध्ये वैभव सूर्यवंशी आणि त्यांच्या वडिलांना भेटलो आणि त्यावेळी मी त्याला उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. आयपीएलमधील त्यांच्या चमकदार कामगिरीनंतर मी त्यांना फोनवरून अभिनंदनही केले. बिहारमधील युवा क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी यांनाही राज्य सरकारकडून १० लाख रुपयांचे मानधन देण्यात येईल.
वैभव सूर्यवंशी यांचे केवळ बिहारच्या मुख्यमंत्र्यांनीच कौतुक केले नाही तर क्रिकेटमधील दिग्गजही त्यांचे कौतुक करत आहेत. सचिन तेंडुलकर, युवराज सिंग, भारतीय कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार रोहित शर्मा आणि टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव यांनीही सोशल मीडियावर त्याचे कौतुक केले.

***

### वैभव सूर्यवंशी खरंच १४ वर्षाचा? भारताच्या ३ खेळाडूंनी केला वयाचा झोल,

मुंबई-राजस्थान रॉयल्सचा खेळाडू वैभव सूर्यवंशीने आयपीएलमध्ये इतिहास घडवला आहे. १४ वर्षाच्या वैभवने गुजरातविरुद्धच्या सामन्यात ३५ बॉलमध्ये शतक झळकावलं. आयपीएल इतिहासात सगळ्यात जलद शतक झळकावणारा वैभव पहिला भारतीय खेळाडू ठरला. तसंच टी-२० क्रिकेटमध्ये सगळ्यात लहान वयात शतक झळकावण्याचा विक्रमही वैभवने केला आहे. शतक झळकावलं त्या दिवशी वैभवचं वय १४ वर्ष आणि ३२ दिवस एवढं होतं, पण आता वैभवच्या वयावरून वाद सुरू झाले आहेत.
वैभवने दोन वेगवेगळ्या मुलाखतींमध्ये त्याचं वय वेगवेगळं सांगितलं. वैभव सूर्यवंशीने त्याच्या दोन मुलाखतींमध्ये त्याच्या वाढदिवसाच्या दोन वेगवेगळ्या तारखा सांगितल्या. एका वर्षापूर्वी दिलेल्या एका मुलाखतीमध्ये वैभने त्याचा वाढदिवस २७ सप्टेंबर असल्याचे सांगितले, तर दुसऱ्या व्हिडिओमध्ये तो आपला वाढदिवस २७ मार्च असल्याचे म्हणाला. या दोन्ही व्हिडिओमध्ये त्याने आपला जन्म २०११ साली झाल्याचे सांगितले.
भारताच्या ३ खेळाडूंनी चोरले वय
भारताच्या तीन खेळाडूंनी त्यांचे वय चोरले होते. खोटे वय सांगितल्यानंतर बीसीसीआयने या खेळाडूंवर कारवाई केली. या तीनही खेळाडूंवर बीसीसीआयने काही काळ बंदी घातली होती. यातले दोन क्रिकेटपटू यंदाची आयपीएल खेळत आहेत.
नितीश राणा
डावखुरा आक्रमक बॅटर नितीश राणा या मोसमात राजस्थान रॉयल्सकडून खेळत आहे. बीसीसीआयने २०१५ साली दिल्लीच्या २२ खेळाडूंवर वय चोरी केल्याप्रकरणी बंदी घातली होती, यामध्ये नितीश राणाचाही समावेश होता. नितीश राणावर एज-ग्रुप स्पर्धांमध्ये खेळण्यापासून बंदी घातली गेली होती.
रसिख सलाम
रसिख सलाम आयपीएलमध्ये निवड झालेला जम्मू काश्मीरचा तिसरा खेळाडू होता. २०१९ साली रसिख सलाम मुंबईकडून खेळला होता, पण संपूर्ण मोसमात त्याला एकच मॅच खेळता आली. रसिखवर २०१९ साली २ वर्षांची बंदी घातली गेली, कारण त्याने खोटे वय सांगितले होते. यानंतर २०२२ साली रसिखने पुनरागमन केलं. यावर्षी रसिख सलाम आरसीबीकडे आहे.
मनजोत कालरा
मनजोत कालराने भारताला अंडर-१९ वर्ल्ड कप जिंकवण्यात मोलाची भूमिका बजावली होती. फायनलमध्ये मनजोत कालराने नाबाद १०१ रनची खेळी केली होती, ज्यामुळे भारताने टी-२० वर्ल्ड कप जिंकला होता. पण मनजोत कालरावर खोटं वय सांगितल्याप्रकरणी २०२० साली २ वर्षांची बंदी घालण्यात आली. तसंच त्याच्यावर रणजी ट्रॉफी खेळण्यावरही एक वर्षाची बंदी होती. कालरा आयपीएल २०१८ साली दिल्ली कॅपिटल्स टीमसोबत होता, पण त्याला एकही मॅच खेळण्याची संधी मिळाली नाही.

***

### ज्यामुळे घटस्फोट झाला अखेर तेच घडले, मिस वर्ल्डच्या घरात राहायला गेला चहल

मुंबई-युजवेंद्र चहल यापूर्वी धनश्रीशी घटस्फोटाच्या बातम्यांमुळे चर्चेत होता. त्यानंतर त्याचे नाव आरजे महवशशी जोडले गेले. पण सध्या तो मुंबईतील त्याच्या नवीन पत्त्याबद्दल चर्चेत आहे. खरंतर, मायानगरमध्ये, युजवेंद्र चहल एका मुलीच्या घरी राहणार आहे जी मिस वर्ल्ड इंडिया राहिली आहे, जी एक अभिनेत्री आणि सुपरमॉडेल देखील आहे. आम्ही नताशा सुरीबद्दल बोलत आहोत, जिचे अपार्टमेंट युजवेंद्र चहलने राहण्यासाठी भाड्याने घेतले आहे. महिन्याचं भाडं काय?युजवेंद्र चहलने माजी मिस वर्ल्ड इंडिया नताशा सुरीचे मुंबईतील अपार्टमेंट दरमहा ३ लाख रुपयांना भाड्याने घेतले आहे. यासाठी त्याने ४ फेब्रुवारी २०२५ रोजी करारावर स्वाक्षरी केली होती. चहलने नताशा सुरीच्या अपार्टमेंटला भाड्याने देण्यासाठी १० लाख रुपयांचे डिपॉजिट मनी देखील जमा केली आहे. सध्या दोघांमधील हा करार २ वर्षांसाठी आहे. भाडे करारात एका वर्षानंतर भाड्यात ५म वाढ करण्याचा उल्लेख आहे. युजवेंद्र चहल यांनी भाड्याने घेतलेले अपार्टमेंट अंधेरी पश्चिम येथे आहे आणि त्याचे क्षेत्रफळ १३९९ चौरस फूट आहे.

# चेन्नईचा आयपीएलमधील प्रवास संपुष्टात

## पंजाबचा ४ विकेट राखत विजय;दिल्लीच्या गोलंदाजांची शानदार कामगिरी

नवी दिल्ली : आयपीएलच्या यंदाच्या हंगामात गत विजेता कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स यांच्यात झालेल्या आयपीएलच्या सामन्यात कोलकात्याच्या संघाने २० षटकांत २०४ धावा केल्या. यावेळी दिल्लीच्या गोलंदाजांनी शानदार कामगिरी केली. दिल्लीच्या गोलंदाजांपैकी अक्सर पटेल याने २ फलंदाज तर विपराज निगम याने २ फलंदाज बाद केले. मिचेल स्टार्क आणि दुशमंथा चामरा यांनी प्रत्येकी १ फलंदाज बाद केला. कोलकात्याच्या फलंदाजांपैकी सलामीवीर गुरबाझ याने २६ धावा केल्या. तर सुनिल नार्णे याने २७ धावा केल्या. अजिंक्य रहाणे २६ धावांवर बाद झाला. त्याला अक्सर पटेल याने पायचित बाद केले.
अंगरिश रघुवंशी याने ४४ धावा केल्या. त्याचे अर्धशतक थोडक्यात हुकले. व्यंकटेश अय्यर ७ धावांवर तर रिंकू सिंग ३६ धावांवर बाद झाला. रसेल याने १७ तर रोमन पॉवेल याने ५ धावा केल्या.



इंडियन प्रीमियर लीग २०२५च्या ४९व्या सामन्यात चेन्नईला घरच्या मैदानावर पराभवाचा सामना करावा लागला आहे. श्रेयस अय्यरच्या तुफानी फलंदाजीच्या जोरावर पंजाबने चेन्नईला ४ विकेट राखत हरवले.
श्रेयस अय्यरने ४१ बॉलमध्ये ७२ धावांची तडाखेबंद खेळी साकारली. त्याआधी प्रियांश आर्य आणि प्रभासिमर सिंग यांनी चांगली सुरूवात पंजाबला करून दिली. प्रियांश आर्याने २३ धावा केल्या तर प्रभासिमरनने ५४ धावा केल्या. त्यानंतर अय्यरने तुफानी खेळीला सुरूवात केली. या तिघांच्या खेळीच्या जोरावर पंजाबने १९१ धावांचे आव्हान ४ विकेट राखत पूर्ण केले.
महेंद्रसिंग धोनीच्या चेन्नईसाठी हा सामना अतिशय महत्त्वाचा होता. या पराभवासोबतच चेन्नई सुपर किंग्स संघ या स्पर्धेबाहेर गेला आहे.चेन्नई सुपर किंग्सने पहिल्यांदा फलंदाजी करताना २० षटकांत १९० धावा केल्या होत्या. पहिल्यांदा फलंदाजीस उतरलेल्या चेन्नईची सुरूवात चांगली नव्हती. तिसऱ्याच षटकांत चेन्नईला पहिला झटका बसला. शेख रसीदला अर्शदीपने बाद केले. रसीदने केवळ ११ धावा केल्या. यानंतर पुढच्याच षटकांत आयुष म्हात्रेने आपली विकेट गमावली. यानंतर जडेजा चांगल्या लयीमध्ये दिसत होता. मात्र सहाव्या षटकांत बराने त्याला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. जडेजाने केवळ १७ धावा केल्या. दरम्यान, सॅम करन आणि डेवाल्ड ब्रेविस यांच्यात चांगली भागीदारी झाली. दरम्यान, १५व्या षटकांत ब्रेविसची विकेट पडली आणि ७८ धावांची भागीदारी संपली. दुसरीकडे सॅम करन टिकून होता. सॅम करनने ३० बॉलमध्ये अर्धशतक ठोकले.

## मी पुढची मॅच खेळणार की नाही..., टॉसनंतर धोनीने फोडला मोठा बॉम्ब




दिल्ली-आयपीएलच्या आजच्या सामन्यात पंजाब किंग्ज आणि चेन्नई सुपर किंग्ज भिडणार आहे. या सामन्याचा टॉस पंजाब किंग्जचा कर्णधार श्रेयस अय्यरने जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे चेन्नई सुपर किंग्ज प्रथम फलंदाजीला उतरणार आहे. यावेळी टॉस दरम्यान बोलताना धोनीने मोठा बॉम्ब फोडला आहे.ज्यामुळे चेन्नईचा गोटात मोठी खळबळ माजली आहे. खरं तर ऋतुराज गायकवाड दुखापतग्रस्त झाल्यानंतर चेन्नई सुपर किंग्जची धूरा महेंद्र सिंह धोनीच्या खांद्यावर आली आहे. त्यामुळे आता चेन्नई सर्व सामने आता धोनीच्या नेतृत्वात खेळणार आहे. पण टॉस दरम्यान धोनीने खळबळ उडवणार विधान केलं आहे. मला माहित नाही मी पुढचा सामना खेळणार की नाही,असे विधान धोनीने केली आहे.त्यामुळे चेन्नईच्या फॅन्सना मोठा झटका बसला आहे.
टॉसनंतर बोलताना धोनी म्हणाला, मला माहित नाही मी पुढचा सामना खेळणार आहे की नाही. यानंतर तो हसला होता. त्यानंतर धोनी पुढे म्हणतो,तुम्ही घरच्या मैदानावर खेळता त्या बहुतेक सामन्यांमध्ये घरचा फायदा खूप महत्त्वाचा असतो ज्याचा आपण फायदा घेऊ शकलो नाही, अशी खंत धोनीने व्यक्त केली.
धोनी पुढे म्हणतो,आम्ही असा संघ आहोत जिथे आम्ही फारसे बदल करत नाही. पण या हंगामात आम्ही बरेच बदल केले आहेत. कारण सोपे आहे. जर तुमचे बहुतेक खेळाडू चांगले करत असतील, तर तुम्ही १-२ खेळाडूंची छाटणी करता आणि बदलता.पण या हंगामात ते आमच्यासाठी काम करत नाही.
श्रेयस अय्यर टॉस दरम्यान काय म्हणाला?
आम्ही प्रथम गोलंदाजी करणार आहोत. खेळाडूंचा उत्साह खूप आहे आणि ते एका उत्तम खेळाची वाट पाहत आहेत. दुर्दैवाने मॅक्सवेलच्या बोटाला फ्रॅक्चर झाले आहे. पण त्याच्या जागी कोणता खेळाडू निवडला नाही, असे अय्यरने सांगितले.

## शिखर धवनने शाहिद आफ्रिदीला दाखवून दिली आपली जागा; म्हणाला, आम्ही तुम्हाला कारगिलमध्येही..

नवी दिल्ली-भारत आणि पाकिस्तानमधील संबंध अधिक कटु झाले आहेत. काश्मीरमधील पहलगाम येथे भ्याड हल्ला झाला आहे. यामध्ये भारताचे २६ लोकांनी आपले प्राण गमावले. या हल्ल्यानंतर भारतातील जनतेचा राग शिगेला पोहोचला आहे. यात भर म्हणजे पाकिस्तानकडून अनेक लज्जास्पद विधाने येतच आहेत. पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू शाहिद आफ्रिदीने पाकिस्तानने काही केलं आहे याचे भारताकडून पुरावे मागितले. एवढंच नाही तर त्यांनी आठ लक्ष भारतीय सैन्य काय करत होते असाही टोमणा मारला. भारत सरकारवर आपल्या लोकांचे जीव घेतल्याचा आरोप केला होता. त्यांच्या या विधानावर बरीच टीका झाली. आता पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदीला शिखर धवनने चांगलेच फटकारले आहे. शाहिदच्या प्रश्नांना आता शिखर धवनकडून चोख उत्तर देण्यात आले आहे. काय म्हणाला शिखर धवन जाणून घेऊयात... काय म्हणाला शिखर धवन?
सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ट्विट करत धवन म्हणाला की, ''कारगिलमध्येही हरवले होते. आधीच पातळी सोडली आहे आता अजून किती पातळी सोडणार, उगाचच कमेंट्स करण्यापेक्षा तुमच्या देशाच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करणे चांगले.'' यानंतर त्याने या पोस्टवर शाहिद आफ्रिदीलाही टॅग केले. पुढे लिहित धवन म्हणाका की, ''आम्हाला आमच्या भारतीय सैन्याचा खूप अभिमान आहे. भारत माता की जय! जय हिंद!''
काय म्हणालेला शाहिद आफ्रिदी?
शाहीद आफ्रिदीने सामा टीव्हीवर मुलखात देताना सर्व मर्यादा ओलांडल्या. त्याने भारतीय सैन्याविरुद्ध गरळ ओकली आहे. तो म्हणाला की, ''जर तिथे (जम्मू आणि काश्मीर) फटाके फुटले तरी ते पाकिस्तानने केले आहे असे म्हणतात. काश्मीरमध्ये तुमचे ८,००,००० सैनिक आहेत आणि तरीही हे घडले. याचा अर्थ तुम्ही निरुपयोगी आणि अक्षम (''नालायक हो-निकम्मे हो) आहात, कारण तुम्ही लोकांना सुरक्षा देऊ शकत नाही.''
भारत सरकारने शाहिदचे युट्यूब चॅनेल केले ब्लॉक
पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पाकिस्तान क्रिकेट संघाचा माजी दिग्गज खेळाडू शोएब अख्तरवर मोठी कारवाई केली आहे. केंद्र सरकारने शोएब अख्तरचं युट्यूब चॅनेल ब्लॉक करण्याचा निर्णय घेतला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ जणांना आपला जीव गमवावा लागला होता.
क्रिकेट सामन्यांचं विषण आणि जागतिक क्रिकेटवर नेहमी भाष्य करत असल्याने शोएब अख्तर भारतातही लोकप्रिय आहे. केंद्र सरकारने फक्त शोएब अख्तरवर कारवाई केली नसून, त्याच्यासह इतर १६ इतर चॅनेल्सवरही कारवाई करण्यात आली आहे. बंदी घातलेल्या प्लॅटफॉर्म्सचे एकत्रितपणे सुमारे ६.३ कोटी सबस्क्रायबर्स आहेत. त्यात डॉन न्यूज, समा टीव्ही, एआरवाय न्यूज, बोल न्यूज, रफ्तार, जिओ न्यूज आणि सुनो न्यूज सारख्या

## सलग ५ मॅच जिंकल्या, तरी मुंबईचे प्ले-ऑफचे समीकरण बिघडले, हार्दिकच्या हार्टबिट वाढल्या!

मुंबई-आयपीएल २०२५ आता निर्णायक टप्प्यावर येऊन पोहोचलं आहे, त्यामुळे प्ले-ऑफची रेस आणखी रोमांचक झाली आहे. या आठवड्याच्या शेवटी प्ले-ऑफमध्ये कोणत्या चार टीम क्वालिफाय होणार? हे चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे. आयपीएलच्या पहिल्या टप्प्यात दिल्ली कॅपिटल्सने धमाका केला होता. दिल्लीने पहिल्या चार पैकी चार मॅच जिंकल्या होत्या, त्यामुळे ते प्ले-ऑफला पोहोचतील, असं वाटतं होतं. पण आयपीएलच्या दुसऱ्या टप्प्यात दिल्लीला एकामागोमाग एक पराभवाचे धक्के बसले, त्यामुळे सध्या दिल्ली पॉईंट्स टेबलमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे.
आरसीबीसाठी सोपा पेपर
पॉईंट्स टेबलमध्ये सध्या आरसीबी पहिल्या क्रमांकावर आहे. आरसीबीच्या खात्यात १४ पॉईंट्स आहेत. तसंच आरसीबीचे उरलेले सामने सीएसके, लखनऊ, हैदराबाद आणि कोलकाता या तळाच्या टीमविरोधात आहेत. या चारही सामन्यांमध्ये आरसीबीचा विजय झाला तर ते २२ पॉईंट्ससह पहिल्या क्रमांकावर राहू शकतात.
मुंबईसमोर आव्हान
या मोसमात मुंबईने पहिल्या ५ पैकी फक्त एकच मॅच जिंकली होती, पण त्यानंतर हार्दिकच्या टीमने लागोपाठ ५ सामन्यांमध्ये विजय मिळवला. १२ पॉईंट्ससह मुंबई सध्या दुसऱ्या क्रमांकावर आहे, पण मुंबईचे उरलेले चार सामने हे तसे सोपे नाहीत. मुंबईचे पुढचे सामने हे राजस्थान, गुजरात, पंजाब आणि दिल्ली यांच्याविरोधात आहेत. सोमवारी गुजरातविरुद्धच्या सामन्यात वैभव सूर्यवंशीच्या धमाकेदार खेळीमुळे




राजस्थानला सूर सापडला आहे, त्यामुळे राजस्थानविरुद्धची मॅचही मुंबईसाठी सोपी नसेल. दुसरीकडे गुजरात आणि पंजाबच्या टीमनेही यंदाच्या मोसमात धमाका केला आहे. मुंबईचे उरलेले सामने पाहता लागोपाठ ५ विजयानंतरही कर्णधार हार्दिक पांड्यासमोर मोठं चॅलेंज उभं ठाकलं आहे.
गुजरातला दिलासा
टॉप-४ मधल्या तीन टीमने १० मॅच खेळल्या आहेत, पण गुजरातने फक्त ९ सामने खेळले आहेत, जो त्यांच्यासाठी दिलासा ठरू शकतो. गुजरातच्या उरलेल्या मॅच यंदाच्या मोसमात संघर्ष करत असलेल्या हैदराबाद, सीएसके तसंच लखनऊसोबत आहेत. याशिवाय गुजरात मुंबई आणि दिल्लीविरुद्धही खेळणार आहे.
दिल्लीसाठी प्ले-ऑफ दूर
आयपीएलच्या पहिल्या टप्प्यात धमाका करणाऱ्या दिल्लीची गाडी दुसऱ्या टप्प्यात रुळावरून घसरली आहे. दिल्लीचे उरलेले सामने हैदराबाद, पंजाब, गुजरात आणि मुंबईविरुद्ध आहेत, यापैकी शेवटचे तीन सामने दिल्लीला कठीण जाऊ शकतात, ज्यामुळे त्यांच प्ले-ऑफला पोहोचण्याचं स्वप्न भंगू शकतं.
पंजाबमुळे कुणाला धक्का बसणार?
पंजाब किंग्सचे यंदाच्या मोसमात ९ पैकी ५ मॅच जिंकल्या आहेत तर ३ सामन्यांमध्ये त्यांचा पराभव झाला आणि केकेआरविरुद्धची त्यांची मॅच पावसामुळे रद्द झाल्याने त्यांना १ पॉईंट मिळाला. हाच एक पॉईंट पंजाबला चौथ्या क्रमांकावर क्वालिफाय होण्यासाठी मदत करू शकतो. पंजाबचे उरलेले सामने चेन्नई, लखनऊ, दिल्ली, मुंबई आणि राजस्थानविरुद्ध आहेत. यात चेन्नई, लखनऊ आणि दिल्लीचा सध्याचा फॉर्म पाहता पंजाबला टॉप-२ टीममध्ये येण्याची संधी आहे. बुधवारी चेन्नईविरुद्धच्या सामन्यात पंजाबचा विजय झाला तर ते पॉईंट्स टेबलमध्ये दुसऱ्या क्रमांकावर जातील.

## भारताविरोधात वायफळ बडबड करणाऱ्या शाहीद आफ्रिदीला दणका

इस्लामाबद-पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तान क्रिकेट संघाचा माजी कर्णधार शाहीद आफ्रिदीनं भारताविरोधात गरळ ओकली होती. भारत सरकारनं आता शाहीद आफ्रिदीला दणका देणारा निर्णय घेतला आहे. भारतात कोणताही व्यक्ती यापुढं शाहीद आफ्रिदीचा यूटयूब चॅनेल पाहू शकणार नाही. भारत सरकारनं यापूर्वी देखील काही पाकिस्तानी वृत्तवाहिन्या आणि क्रिकेटपटूंच्या यूट्यूब चॅनेलवर बंदी घातली होती. शोएब अख्तर, राशिद लतीफ आणि तनवीर अहमद या खेळाडूंच्या यूट्यूब चॅनेलवर भारतात बंदी घालण्यात आली आहे. शाहीद आफ्रिदीनं मागितलेले पुरावे जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवादी हल्ल्यासंदर्भात शाहीद आफ्रिदीनं एक वक्तव्य केले होते.
तो म्हणालेला की या घटनेवर राजकारण होऊ नये यावर माझा विश्वास आहे. मात्र, जसा पाकिस्तानमध्ये हल्ला झाला तसा थेट पाकिस्तानचे नाव घेतलं गेलं. भारतानं पुराव्यासह समोर यावं आणि जगाला सांगावे, कोणताही धर्म दहशतवादाला पाठिंबा देत नाही, असं शाहीद आफ्रिदी म्हणाला.भारतात जे घडले ती खेदाची गोष्ट आहे, पाकिस्तानात जे होत असते ते देखील खेदजनक असते. मात्र, असे होऊ नये.
तो म्हणाला दोन्ही शेजारी देशांनी चांगल्या प्रकारे राहायला हवे, लढाई आणि वाद टाळावेत.शाहिद आफ्रिदीने वायफळ बडबड सुरुच ठेवली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतातील माध्यमांचं बॉलिवूड झाल्याचं म्हटलं.
प्रत्येक गोष्टीला बॉलिवूड करु नका, मी हैराण झालो, इतर लोक याची मजा घेत होते. भारतात फटाका फुटला तरी लोक म्हणतात पाकिस्ताननं फोडला. तुमची ८ लाख सैन्याची फैज काश्मीरमध्ये आहे. म्हणजेच तुम्ही तुमच्या लोकांना सुरक्षा देऊ शकला नाही,असं शाहीद आफ्रिदी म्हणाला होता. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू
जम्मू काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाममध्ये २२ एप्रिलला दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला होता. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता.या हल्ल्यानंतर संपूर्ण देशभर संतापाची लाट आहे. भारत सरकारनं पाकिस्तान विरोधात काही कठोर निर्णय घेतले आहेत. भारताच्या या आक्रमक कारवाईचे पडसाद पाकिस्तानात दिसून येत आहेत. पाकिस्तान स्टॉक एक्सचेंज ३५०० अंकांनी गडगडला आहे.

# मध्य रेल्वे विशेष गाड्यांच्या सेवांची कालावधी वाढवणार

मुंबई/प्रतिनिधीः– मध्य रेल्वे खाली दिलेल्या तपशीलांनुसार प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन विशेष गाड्यांच्या सेवांचा कालावधी वाढवणार आहे.

१. गाडी क्रमांक ०१४३५ सोलापूर ते लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष, जी पूर्वी दि. २९ एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती दि. ०६.०५.२०२५ ते दि. २४.०६.२०२५ पर्यंत वाढवण्यात येत आहे. (८ सेवा)

गाडी क्रमांक ०१४३६ लोकमान्य टिळक टर्मिनस ते सोलापूर साप्ताहिक विशेष, जी पूर्वी दि. ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती दि. ०७.०५.२०२५ ते दि. २५.०६.२०२५ पर्यंत वाढवण्यात येत आहे. (८ सेवा)

२. गाडी क्रमांक ०१४६१ सोलापूर ते दौंड जंक्शन अनारक्षित दैनिक विशेष, जी पूर्वी दि. ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती दि. १.०५.२०२५ पासून दि. ३०.०६.२०२५ पर्यंत वाढवण्यात येत आहे. (६१ सेवा)

गाडी क्रमांक ०१४६२ दौंड जंक्शन ते सोलापूर अनारक्षित दैनिक विशेष, जी पूर्वी दि. ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती दि. ०१.०५.२०२५ पासून दि. ३०.०६.२०२५ पर्यंत वाढवण्यात येत आहे. (६१ सेवा)

३. गाडी क्रमांक ०१४६५ सोलापूर ते कलबुरगि जंक्शन अनारक्षित दैनिक विशेष, जी पूर्वी दि. ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती दि. ०१.०५.२०२५ पासून दि. ३०.०६.२०२५ पर्यंत वाढवण्यात येत आहे. (६१ सेवा)

गाडी क्रमांक ०१४६६ कलबुरगि जंक्शन ते सोलापूर अनारक्षित दैनिक विशेष, जी पूर्वी दि. ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती दि. ०१.०५.२०२५ ते दि. ३०.०६.२०२५ पर्यंत वाढवण्यात येत आहे. (६१ सेवा)

४. गाडी क्रमांक ०१०२४ छत्रपती शाहू महाराज टर्मिनस (कोल्हापूर) – पुणे, जी पूर्वी दि. ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती दि. ०१.०५.२०२५ ते दि. ३०.०६.२०२५ पर्यंत वाढवण्यात येत आहे. (६१ सेवा)

गाडी क्रमांक ०१०२३ पुणे ते छत्रपती शाहू



महाराज टर्मिनस (कोल्हापूर), जी पूर्वी दि. ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती दि. ०१.०५.२०२५ ते दि. ३०.०६.२०२५ पर्यंतवाढवण्यात येत आहे. (६१ सेवा)

५. गाडी क्रमांक ०१२११ बडनेरा जंक्शन ते नाशिक रोड अनारक्षित दैनिक विशेष, जी पूर्वी दि. ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती दि. ०१.०५.२०२५ पासून दि. ३०.०६.२०२५ पर्यंत वाढवण्यात येत आहे. (६१ सेवा)

गाडी क्रमांक ०१२१२ नाशिक रोड ते बडनेरा जंक्शन अनारक्षित दैनिक विशेष, जी पूर्वी दि. ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती दि. ०१.०५.२०२५ पासून दि. ३०.०६.२०२५ पर्यंत वाढवण्यात येत आहे. (६१ सेवा)

६. गाडी क्रमांक ०१४८७ पुणे ते हरंगुळ, जी पूर्वी दि. ३० एप्रिल २०२५ पपर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती दि. ०१.०५.२०२५ पासून दि. ३०.०६.२०२५ पर्यंत वाढवण्यात येत आहे. (६१ सेवा)

गाडी क्रमांक ०१४८८ हरंगुळ ते पुणे, ही गाडी दि. ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती दि. १.०५.२०२५ पासून दि. ३०.०६.२०२५ पर्यंत वाढवण्यात येत आहे. (६१ सेवा)

७. गाडी क्रमांक ०१०९१ खंडवा जंक्शन ते सनावद अनारक्षित विशेष गाडी, जी आधी दि. २९ एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती ०२.०५.२०२५ पासून ३०.०६.२०२५ पर्यंत वाढवण्यात येत आहे. (४४ सेवा)

गाडी क्रमांक ०१०९२ सनावद ते खंडवा जंक्शन अनारक्षित गाडी, जी आधी दि. २९ एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती दि. ०२.०५.२०२५ पासून २४.०६.२०२५ पर्यंत वाढवण्यात येत आहे. (४४ सेवा)

**सुधारित संरचना** – गाडी क्रमांक ०१०२३ (कोल्हापूर – पुणे) साठी दि. ०४.०६.२०२५ आणि ०१०२४ (पुणे – कोल्हापूर) साठी दि. ०५.०६.२०२५ पासून

तृतीय एक वातानुकूलित, ०७ शयनयान, ४ सामान्य द्वितीय श्रेणी, १ सामान्य द्वितीय श्रेणी कम गार्ड ब्रेक व्हॅन आणि १ जनरल व्हॅन. वर नमूद केलेल्या ट्रेनच्या वेळेत आणि थांब्यात कोणताही बदल होणार नाही.

**आरक्षण :** विशेष गाड्या क्रमांक ०१४३५, ०१४३६, ०१०२४, ०१०२३, ०१४८७ आणि ०१४८८ च्या विस्तारित सेवांसाठी विशेष शुल्कासह बुकिंग दि. ३० एप्रिल २०२५ रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in संकेतस्थळावर सुरू आहे.

या विशेष गाडीच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा एनटीईएस प डाऊनलोड करा.

# राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये शैक्षणिक साधनांचे प्रदर्शन



लातूर/प्रतिनिधीः– विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये शनिवारी शालेय स्तरावरील शैक्षणिक प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रदर्शनात विविध प्रकारच्या प्रतिकृती व प्रकल्पाच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान, सौरऊर्जेची निर्मिती व त्याचे फायदे, स्वयंपूर्ण खेडी, ऐतिहासिक वारसा जतन, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण याविषयी संदेश देण्यात आला.

प्रदर्शनाचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्राचे संचालक डॉ. राजेश शिंदे यांच्या हस्ते झाले. श्री. मारवाडी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शैलेश लाहोटी, सचिव आशिष बाजपाई, ईश्वरप्रसाद डागा, हुकूमचंद कलंत्री, स्कूलचे चेअरमन आनंद लाहोटी, आशिष सोमाणी, आशिष अग्रवाल, चैतन्य भार्गव, निखील राठी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विविध विषयावर आधारित नाविन्यपूर्ण प्रयोग, भितीपत्रके, प्रकल्प, प्रतिकृती, माहितीपूर्ण तक्ते, शैक्षणिक खेळ यांचे सादरीकरण केले. मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण संस्कृतीवर आधारित स्वयंपूर्ण खेडी व बलुतेदार पद्धतीचे सुंदर सादरीकरण केले. हिंदीविभागाने लातूर दर्शन घडविले. लातुर जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळे, धार्मिक मंदिरे व जिल्ह्याची विशेषता अधोरेखित केली. विद्यार्थ्यांनी हत्तीबेत, हुतात्मा स्मारक, सिद्धेश्वर मंदिर, उदगीर किल्ला, आदींच्या प्रतिकृती सादर केल्या. इंग्रजीच्या विद्यार्थांनी व्याकरणावर आधारित प्रश्नमंजुषा, पपेट शो, आकर्षक सेल्फी पॉइंट व विविध मॉडेल्स प्रदर्शित केले . संस्कृत विभागाने भारतातील अध्यात्मिक मंदिरांचे सुंदर मॉडेल्स सदर केले. सायन्सच्या विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण वैज्ञानिक प्रयोग सादर केले. गणितामधल्या मूलभूत संकल्पना, मुलभूत तत्त्वे यावर आधारीत अनेक प्रतिकृती, खेळ विद्यार्थी देखील सदर केले होते. समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी नवीन संसद भवन इमारत, हिरोशिमा शहर, महाराष्ट्रातील गड, किल्ले, तलाव आदींच्या प्रतीक्रती साकारल्या. चित्रकला, हस्तकला आदी विषय अधिक विस्ताराने हाताळून भव्य प्रदर्शनांचे आयोजन राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये केले जाते.



# महाराष्ट्र निर्मितीचा इतिहास

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा इतिहास फार जूना आहे. ब्रिटीश सत्तेविरुध्द भारतीय स्वातंत्र्याचा लढा १८८५ साली मुंबईत स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने सुरु केला होता. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे वार्षिक अधिवेशन दरवर्षी भारतातील निरनिराळ्या राज्यात निरनिराळ्या ठिकाणी नित्यनेमाने भरत असत. त्यामध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक इत्यादी जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर साधक – बाधक अशी सविस्तर चर्चा होवून त्यावर ठराव समंत करुन ब्रिटीश शासनाचे भारतातील सर्वोच्च प्रतिनिधी असणार्या व्हाईसरॉय यांना ते पाठविले जात. अशाच प्रकारच्या कॉंग्रेसच्या १९३६ च्या अधिवेशनात भारतातील राज्यांची प्रशासनीक सोयीच्या दृष्टीने केलेली राज्याची रचना बदलून एक भाषिक राज्यांची भाषिक प्रांत रचना करावी असा सर्व संमतीने ठराव पारीत करुन ब्रिटीश व्हाईसरॉय यांच्याकडे पाठविला होता.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्याची यशस्वी सांगता होवून भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी नेते पंडित जवाहरलाल नेहरु यांचा शपथविधी झाला. कॉंग्रेस पक्षाच्या ध्येयधोरणा नुसार भारताच्या केंद्र शासनाने निर्णय घ्यावेत अशी कॉंग्रेस पक्षाचे सर्वसामान्य कार्यकर्ते व जनतेची इच्छा होती. भारतातील मराठी भाषिक जनता देशातील अनेक राज्यात विभागली होती. त्याबाबत मराठीतील ख्यातनाम विचारवंत व साहित्यीकांनी मराठी भाषिकांचे एकच एक स्वतंत्र राज्य व्हावे अशी अपेक्षा आपल्या लिखाणातून व भाषणातून व्यक्त करत होते. मराठी भाषिक जनतेचाही या मागणीस संपुर्ण पाठिंबा होता. त्यावेळी मराठी भाषिक जनता मुंबई राज्य, मध्यप्रांत, हैद्राबाद संस्थान व पोर्तुगालच्या ताब्यातील गोवा अशा चार राज्यात विभागली होती. त्यामुळे भाषिक व सांस्कृतीक ऐकतेच्या दृष्टीने सर्वच मराठी भाषिकांचे एकच एक महाराष्ट्र राज्य करावे ही मराठी भाषिकांची मागणी अतिशय तीव्रतेने शासन दरबारी मांडली जात होती.

सर्व मराठी भाषिकांचे एकच एक राज्य व्हावे यासाठी त्यावेळचे विचारवंत व साहित्यीक न. चिं. केळकर, श्रीधर व्यंकटेश केतकर, दत्तो आप्पाजी तुळजापूरकर, प्रबोधनकार ठाकरे, ग. वि. पटर्वधन, शंकर रामचंद्र शेंडे, ग. त्र्यं. माडखोलकर, दत्तो वामन पोतदार, आचार्य विनोबा भावे, धनंजयराव गाडगीळ, लालजी पेंडसे इत्यादी अनेकांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीस पाठिंबा दिला होता. विदर्भातील बापूजी अणे व ब्रिजलाल बियाणी यांचा स्वतंत्र विदर्भास पाठिंबा होता. परंतू विदर्भातीलच बॅ. रामराव देशमुख, बॅ. पंजाबराव देशमुख. का. तू. देशमुख, ए. पटवर्धन, ग. त्र्यं. माडखोलकर, शेषेराव वानखेडे, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू टी. जे. केदार इत्यादीनी सर्व मराठी भाषा बोलणारांचे एकच राज्य असावे अशी मागणी केली. १२ मे १९४६ बेळगांव येथे मराठी साहित्य संम्मेलन भरले होते. संमेलनाचे अध्यक्ष ग. त्र्यं. माडखोलकर यांच्याच पुढाकाराने संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. महात्मा गांधीचा अगदी सुरुवातीपासून भाषावार प्रांत रचनेस पाठिंबा होता. तसा ठराव कॉंग्रेसच्या अधिवेशनात मंजूर करण्यात आला होता. परंतू महात्मा गांधीच्या नंतरच्या स्वातंत्र्य काळात पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार पटेल, आचार्य कृपलानी, राजाजी इत्यादीनी त्यास विरोध केला तर डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी मात्र भाषावार पांत रचनेस पाठिंबा दिला हे ही एक आश्चर्यच होते.

१७ जून १९४८ मध्ये घटना समितीने भाषावार प्रांत रचनेच्या संदर्भात सर्वकंष विचार करण्यासाठी न्यायमुर्ती दार (धर) समिती नेमण्यात आली. त्या समितीने दिलेल्या अहवालात भाषावार प्रांत रचना सध्याच्या परिस्थितीत राष्ट्रच्या हिताची नाही व भाषिक राज्ये राष्ट्रवादाच्या प्रगतीस अडथळा ठरतील असा उल्लेख करुन भाषिक प्रांत रचनेस विरोध केला. त्यानंतर संपुर्ण देशात याविरुध्द जनतेत असंतोष पसरला. त्यावर त्याच वर्षी म्हणजे १९४८ साली पंडित जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल व पट्टाभिसितारामय्या अशी त्रिसद्स्यीय समिती नेमण्यात आली. या तिघांच्या आद्याक्षरावरुन या समितीचा जे. व्ही. पी. समिती असा उल्लेख केला जात असे. या समितीनेही सद्यस्थितीत भाषावार पांत रचना देशाच्या ऐक्यास व विकासास बाधा ठरेल म्हणून भाषावार प्रांत रचनेस विरोध केला.

तेलगु भाषिक जनता निजामाच्या हैद्राबाद राज्यातील तेलंगना व मद्रास राज्य यामध्ये विभागलेली होती. तेलगु भाषिक जनतेचे एक राज्य करावे यासाठी पोट्टी श्रीरामलू यांनी प्राणांतिक उपोषण सुरु केले. दिनांक १९ ऑक्टोबर १९५२ ते १५ डिसेंबर १९५२ असे ५६ दिवस उपोषण केले. त्यात त्यांचे निधन झाले. त्याचा भयंकर उद्रेक तेलगु भाषिक प्रदेशात झाला. जनतेच्या तिव्र भावना लक्षात घेवून पंडित नेहरुनीं १९ डिसेंबर १९५२ रोजी तेलगु भाषिक आंध्र प्रदेशाची घोषणा केली. एवढेच नाही तर १ ऑक्टोबर १९५३ रोजी नविन आंध्र प्रदेशाची कायदेशीर रित्या निर्मिती पण झाली. परंतू मराठी भाषिक जनतेची न्याय मागणी मात्र तो पर्यंत मान्य करण्यात आली नाही.

भाषिक प्रांत रचनेच्या मागणीवर केंद्रीय शासन मराठी जनतेवर अन्याय करीत असल्याच्या निषेधार्थ केंद्रीय अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी महाराष्ट्राची आण, बान व शान राखीत केंद्रीय मंत्रीमंडळाचा राजीनामा देवून महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली. तसेच राज्य मंत्रीमंडळातील दारुबंदी मंत्री डॉ. त्र्य. र. नरवणे यांनी देखील भाषिक प्रश्नावर राजीनामा देवून महाराष्ट्रातील जनतेचा स्वाभिमान राखला. तर नेमके या उलट कॉंग्रेसचे नेते शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ व त्यांचे उच्चपदस्थ सहाकार्यांनी आपली खुर्ची व दिल्लीतील कॉंग्रेस श्रेष्ठीची मर्जी राखण्यासाठी लाचारी पत्करुन महाराष्ट्रातील जनतेची मान शरमेने खाली झुकवली.

दि. २८ सप्टेंबर १९५३ साली नागपूर करार झाला व त्यात विदर्भ, मराठवाड्यासह मुंबई प्रांतातील मराठी भाषिक प्रदेशाची निर्मिती व्हावी असा ठराव सर्व संमतीने मंजूर करण्यात आला. त्यामध्ये यशवंतराव चव्हाण, भाऊसाहेब हिरे, गोपाळराव खेडकर, रामराव देशमुख, देवीसिंह चौहान, पंढरीनाथ पाटील इत्यादी नेत्यांच्या सह्या होत्या. हा करार विदर्भ, मराठवाडा, कोकण व मुंबईसह उर्वरित महाराष्ट्राच्या विकासाचा मार्गदर्शक असा दिपस्तंभ समजला जातो. डिसेंबर १९५३ साली लोकसभेत राज्य पुर्नरचना आयोगाची न्यायमुर्ती सय्यद फजल अली यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात आली. त्या आयोगाने स्वतंत्र विदर्भाचा पुरस्कार करुन मराठी भाषिक जनतेची घोर निराशा केली. दरम्यानच्या काळात म्हणजेच दि. ११ मार्च १९५४ रोजी हैद्राबाद विधीमंडळातील मराठवाड्याच्या सर्वपक्षीय आमदारांची बैठक होवून त्यामध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीस एकमताने पाठिंबा जाहिर केला. ३७ वे अ. भा. मराठी साहित्य संम्मेलन दिल्ली येथे भरले होते. त्याचे उद्घाटक पंतप्रधान पंडित नेहरु होते. अध्यक्ष लक्ष्मण शास्त्री जोशी होते. तर स्वागताध्यक्ष काकासाहेब गाडगीळ होते. संम्मेलनाच्या अध्यक्षांनी पंडित नेहरुच्या उपस्थितीत संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे अशी निर्भिडपणे मागणी केली हे या संम्मेलनाचे एक खास वैशिष्ट्य होते.

**– नानासाहेब हरिश्चंद्र पाटील,**
माजी नगराध्यक्ष, धाराशिव.
मो. नं. ९४२२४६४०५६

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस शंकरराव मोरे यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या पाठिंब्यासाठी 'जनसत्ता' या वृत्तपत्रातून केंद्र व राज्य शासनावर जळजळीत लेख सातत्याने लिहीत असत. मराठी भाषिक जनतेने तीव्र लढा दिल्याशिवाय संयुक्त महाराष्ट्र होणार नाही असे ठाम प्रतिपादन ते वृत्तपत्रामधून सातत्याने करीत असत. कॉमरेड व्ही. डी. देशपांडे यांनी १९५२ मध्ये 'संयुक्त महाराष्ट्र' नावाचे साप्ताहिक सुरु केले व मराठी भाषिक राज्यांसाठी चळवळीस पाठिंबा दिला.

पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात ६ फेब्रुवारी १९५६ रोजी एस. एम. जोशी यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीस पाठिंबा देणार्या कार्यकर्त्यांची एक बैठक बोलावली व त्याच दिवशी रात्री शनिवार वाड्यासमोर जाहिर सभा घेण्यात आली. जनतेनेही आपल्या प्रचंड उपस्थितीने ही सभा यशस्वी करुन दाखविली. याच सभेत एस. एम. जोशी यांची संयुक्त महाराष्ट्र समितीच्या चिटणीसपदी निवड झाल्याचे जाहिर करण्यात आले. या समितीस उत्स्फुतपणे सक्रिय पाठिंबा देणार्यात कॉमरेड श्रीपाद अमृत डांगे, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे, ना. ग. गोरे, माधवराव बागल, दाजीबा देसाई, कॉमरेड क्रांतीसिंह नाना पाटील, भाई उध्दवराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे, वा. रा. कोठारी, सेनापती बापट इत्यादी नेत्यांचा समावेश होता. दाजीबा देसाई, कॉमरेड क्रांतीसिंह नाना पाटील, भाई उध्दवराव पाटील इत्यादी ग्रामीण भागातील नेत्यांनी सर्व ग्रामीण भाग आपल्या आक्रमक भाषा शैलीने पिंजून काढला तर उर्वरित नेत्यांनी शहरी भागातील जनतेस संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी पेटून उठविले आणि आचार्य अत्रे तर संयुक्त महाराष्ट्र समितीची बुलंद तोफच होती. १ नोव्हेंबर १९५६ रोजी राज्य पुर्नरचने प्रमाणे मुंबईसह मराठी भाषिक व गुजराथी भाषिक अशी द्विभाषिक राज्याची स्थापना झाली व त्या द्विभाषिक राज्याचे पहिले व शेवटचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांची निवड करण्यात आली. यशवंतराव चव्हाणांना हे द्विभाषिक राज्य चालविणे किती कठीण आहे याची कल्पना होती. यापुर्वी मोरराजी देसाई मुख्यमंत्री असतानाच्या काळात मराठी भाषिक आंदोलनातील १०६ हुताम्यांचा बळी घेतला. केंद्रीय मंत्री स. का. पाटील यांनी 'येत्या ५००० वर्षात मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही' अशी घोषणा केली तर मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी 'आकाशांत चंद्र, सुर्य असे पर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही' अशी प्रतिज्ञा केली.

दरम्यानच्या काळात १८ डिसेंबर १९५८ रोजी संयुक्त महाराष्ट्र समितीने देशाची राजधानी दिल्लीवर प्रचंड मोर्चा काढला. त्यामध्ये शाहिर आण्णाभाऊ साठे, शाहिर अमर शेख, शाहिर साबळे इत्यांदीनी मोर्चात उत्साह व उर्जा निर्माण केली. महाराष्ट्रातून आलेल्या मराठी भाषिक जनतेचा लाखोंचा मोर्चा पाहण्यासाठी व ऐकण्यासाठी दिल्लीतील लाखो लोकांनी उर्स्फुत प्रतिसाद दिला आणि त्याच वेळी पंतप्रधान नेहरुंना महाराष्ट्रातील जनतेच्या भावनेची तीव्रता समजली व हळूहळू त्यांचे विचार संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी अनुकूल होत गेले. प्रतापगढावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या उद्घाटनासाठी पंतप्रधान नेहरु आले होते, त्यावेळी महाराष्ट्रातील तमाम जनतेने संयुक्त महाराष्ट्राच्या घोषणा देवून त्यांना महाराष्ट्रातील जनतेच्या तीव्र भावना लक्षात आणून दिल्या. तत्कालीन गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांनी मुंबई व औरंगाबाद इत्यादी ठिकाणी भेट देवून लोकभावना समजून घेतल्या. तत्कालीन अ. भा. कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षा इंदिरा गांधी यांनी आपल्या वडिलांची म्हणजे पंडित नेहरुंची संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत अनुकूल भुमिका तयार करण्यात महत्वाचा वाटा उचलला. केंद्रीय गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांनी ३१ मार्च १९६० रोजी संसदेत मुंबई प्रांत पुनररचना विधेयक मांडले व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली आणि नविन राज्यास बॉम्बे स्टेट असे नाव देण्याचे निश्चित केले होते. परंतू महाराष्ट्रातील सर्वपक्षीय नेत्यांनी त्यास प्रखर विरोध करुन 'महाराष्ट्र राज्य' हेच नामकरण कायम केले. अशा रितीने १ मे १९६० रोजी सकल मराठी जनतेच्या मागणी प्रमाणे महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली.



# भीम गीताचा कार्यक्रम संपन्न



धाराशिव (प्रतिनिधी)–समाज प्रबोधन पर भीम गीताचा कार्यक्रम संपन्न दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व प्रज्ञा सूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली सायंकाळी ठीक सात वाजता महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पूजन सम्राट अशोक धम्मचक्र बहुद्देशीय प्रतिष्ठान चे सचिव प्रशांत बाबासाहेब बनसोडे, सम्राट बनसोडे, बी आर आंबेडकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष रोहित शिंगाडे संतोष वाघमारे, प्रमोद ढवळे, विकी नाईकवाडे, अजिंठा प्रतिष्ठानचे अलंकार बनसोडे, लालासाहेब सुकाळे यांच्या हस्ते करण्यात आले या नंतर भिमशाहिर अतुल गंगावणे यांनी समाज प्रबोधन पर भीम गीताची सुरुवात करण्यात आली सदरील कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विनोद बनसोडे.रोहित बनसोडे. सचिन गायकवाड. अक्षय बनसोडे. राजरत्न ओव्हाळ, विकास गंगावणे, नंदू हावळे, सिद्धार्थ बनसोडे यांनी परिश्रम घेतले समाज प्रबोधन पर भीम गीताचा कार्यक्रमास परिसरातील प्रतिष्ठित नागरिक रावसाहेब शिंगाडे, प्रित्यर्थ ओव्हाळ, महादेव माने, नाना मस्के, दादा झेंडे ,नाना माने, विकास बनसोडे, हुंकार बनसोडे, प्रवीण बनसोडे, योगेश वाघमारे, नागेश शिंगाडे, किरण कांबळे, संतोष हुंडे, धनंजय बनसोडे, बाळू विधाते, संदेश शिंगाडे, विशाल बनसोडे, समाधान वाघमारे, धनंजय नाईकवाडी, अजय वाघमारे, धीरज वाळवे, अनिल बंटी बनसोडे मिलिंद वाघमारे, राऊसाहेब मस्के, अरून गायकवाड, आदी उपस्थितीत होते

# महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त बसव प्रतिष्ठाणच्या वतीने अभिवादन



मुरूम, (प्रतिनिधी) : –अक्षय तृतीय या शुभ मुहूर्तावर संपूर्ण देशभर जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती तिथीनुसार साजरी केली जाते. लोकशाहीचे आद्यजनक महात्मा बसवेश्वर हे १२ व्या शतकातील थोर समाजसुधारक होते. बुधवारी (ता.३०) रोजी अक्षय तृतीय तिथीनुसार मुरूम शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बसव प्रतिष्ठाणच्या अखिल भारतीय सामाजिक संघटनेमार्फत पूर्णाकृती पुतळ्याचे स्थापना करण्यात आली. मुरूम पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस फौजदार ज्ञानेश्वर गव्हाणे, माजी नगराध्यक्ष रशीद शेख, चंद्रशेखर मूदकण्णा,सिद्धेश्वर भालेराव,अमृत वरनाळे, माजी सैनिक विजयकुमार हिरेमठ, भगत माळी,राहुल वाघ,आप्पासाहेब बिराजदार,रफिक पटेल, किरण गायकवाड यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी प्रतिष्ठाणचे अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे, डिंगबर सोनटक्के,प्रा. करबसप्पा ब्याळे,प्रा.महेश मोटे,काशिनाथ मीरगाळे,शिवा मूदकण्णा,महेंद्र कांबळे,शंकर सोलापुरे, सुरेंद्र सक्करगी, प्रा.सादु गायकवाड,अमित ढाले,उमेश ईकळगे,अर्जुन कदम आदीसह बसव भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रतीवर्षीप्रमाणे यंदाही जयंतीनिमित्त एक दिवशीय पुतळा प्रतिष्ठापना करण्यात आली. राज्यातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा मे महिन्यात राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. व त्याच बरोबर श्री महात्मा बसवण्णा पोवाड्याचे आयोजन करण्यात आले आहे,

सदर कार्यक्रमाचे आयोजन मुरूम शहरातील रत्नमाला मंगल कार्यालयात दि.२५ मे रोजी आयोजित करण्यात आला असल्याची माहिती बसव प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांनी दिली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच बिरुदेव डोणे आयपीएस अधिकारी – पुजार

## १२० सदस्यांचा गजाढोल, १२ प्रकारचे बँड पथक, संबळाचा ताल,थाटात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीची मिरवणूक



धाराशिव दि.२९ (प्रतिनिधी) – भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची देशाच्या अर्थकारण शिक्षण सर्व क्षेत्रावर छाप आहे. शासन जे उपक्रम राबवित आहे त्याचा जन्म डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा आहे. बाबासाहेबांनी दूरदृष्टीचा विचार करून अतिशय मेहनतीने भारतीय संविधान तयार केले. त्यामध्ये सर्व जाती घटकांचा विचार केला असून त्यांच्यामुळेच सर्वसामान्य घरातील बिरुदेव डोणे हे युपीएससी परीक्षेच्या माध्यमातून आयपीएस अधिकारी होऊ शकले असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजारी यांनी दि.२७ एप्रिल रोजी केले. दरम्यान, विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय सामाजिक कामगिरी करणाऱ्या विश्वनाथ शिवमूर्ती तोडकर, प्रवीण तानाजीराव बागल, पंकज संभाजीराव काटे, कैलास चिंतामणराव शिंदे, राजेंद्र निकाळजे, प्रा.डॉ.सतिश सुखदेव कदम, एस.के.चेले, हरीश डावरे, दादासाहेब जेटीथोर, ड. खंडेराव चौरे, संजय कोंडीबा बनसोडे, गौरी राजेश शिंदे, गुणवंत दगडू सोनवणे व धनंजय रोहिदास वाघमारे यांचा समाजरत्न पुरस्काराने येथोचित सन्मान करण्यात आला. तसेच शहरातील ज्येष्ठ नागरिकांचा देखील समितीच्या वतीने जिल्हाधिकारी यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे अध्यक्ष धनंजय शिंगाडे यांच्या अध्यक्षतेखाली धाराशिव शहरातून डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, अहिल्यादेवी होळकर व महात्मा फुले यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक प्रारंभापूर्वी आयोजित समाज रत्न पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा जयंती उत्सव समितीचे मार्गदर्शक धनंजय नाना शिंगाडे उत्सव समितीचे अध्यक्ष मुकुंद घुले,ॲड. परवेज काझी,विश्वास शिंदे,डॉ. स्नेहा सोनकाटे,चंद्रजीत जाधव,कोषाध्यक्ष विशाल शिंगाडे, कार्याध्यक्ष संजय मुंडे, खलील सय्यद, रविंद्र सुर्यवंशी, पाडूरंग भोसले,नाना घाटगे,इलियास मुजावर,अर्जुन पवार, प्रसेंजीत शिंगाडे, सारिपुत शिंगाडे, रवि कोरे आळणीकर, इंद्रजित देवकते, सतिश कदम, लक्ष्मण माने, अनिरुद्ध कावळे,बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे पदाधिकारी यांचेसह आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना जिल्हाधिकारी पुजार म्हणाले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लोककल्याणाचा अंतर्भाव संविधानामध्ये केलेला आहे त्यामुळे सर्वांनी लोक कल्याणाची कामे केली पाहिजेत. तसेच त्यांनीच अभिव्यक्ती स्वातंत्र्यसह मूलभूत अधिकार सर्वांना दिलेले आहेत. त्याचे जन्मदाते हे आंबेडकर असून संविधानाची माहिती प्रत्येकांनी आत्मसात करणे गरजेचे आहे. त्यासाठी संविधानाची प्रत सर्वांना उपलब्ध उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. तर धनंजय शिंगाडे म्हणाले की, गेल्या ३१ वर्षांपासून सर्व समुदायाला सोबत घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात येत आहे. आजपर्यंत सर्व धर्मांच्या लोकांना अध्यक्षपदाचा मान देणारी ही महाराष्ट्रातील एकमेव संघटना आहे. त्यामुळे तरुणासह सर्वांनीच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे अनुकरण करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी सक्षणा सलगर यांनीही आपले विचार व्यक्त केले. भिमनगर येथून प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत सायंकाळी मिरवणूकीला सुरुवात करण्यात आली. मिरवणुकीच्या सुरुवातीला असलेल्या सजवलेल्या रथात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या मूर्ती ठेवण्यात आल्या होत्या. यावेळी सर्व महापुरूषांच्या मूर्तींचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर मिरवणुकीला शिस्तबद्ध पद्धतीने सुरुवात करण्यात आली. यावेळी १२० सदस्यांचा समावेश असलेले गजाढोल पथक मिरवणुकीचा आकर्षणाचा केंद्रबिंदू बसने होते. यावेळी ढोल घेऊन नाचणाऱ्यांनी उत्कृष्ठ पदलालित्य दाखवत केलेले नृत्य प्रत्येकांना भुरळ पाडत होते. ढोलाच्या तालावर अनेकांनी ताल धरत बेभान होऊन नृत्य केले.

**पारंपरिक बँड पथकांचा नजराना**

केरळ राज्य, कोल्हापूर, सांगली व अन्य जिल्ह्यातील पारंपरिक वाद्य पथक, बँड पथकही मिरवणुकीत सहभागी करण्यात आले होते. यांचीही कला एकत्रितपणे धाराशिवकरांना प्रथमच अनुभवता आली. आपल्या वेगळ्या शैलित त्यांनी केलेले सादरीकरण सर्वांच्या टाळ्या मिळवत होते. यामध्ये तुळजाभवानी मातेचे संबळ पथकही आकर्षणाचा केंद्रबिंदू बनले होते. नागरिकांनी यामध्ये उत्सफुर्त सहभाग नोंदवला.

**सळसळत्या उत्साहासह युवक, युवतींचा सहभाग**

मिरवणूक भीम नगर, त्रिशरण चौक, पोष्ट ऑफिस, काळा मारुती चौक या मार्गावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंबेडकर चौकपर्यंत नेण्यात आली. येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली. यावेळी सळसळत्या उत्साहासह युवक व युवती मिरवणूकीत सहभागी झाले होते. त्यांनीही प्रत्येक ढोल, व वाद्यांच्या तालावर ठेका धरला होता. मिरवणुकीत ठिकठिकाणी पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

ग्रामीण भागातून आलेले नागरिकही यामध्ये सहभागी झाले होते.

# पोदार इंटरनॅशनल स्कूल येथे इंटरनॅशनल सायन्स ओलिंपियाड पदक वितरण सोहळा संपन्न



धाराशिव (प्रतिनिधी)– दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिव येथे इंटरनॅशनल सायन्स ओलिंपियाड पदक वितरण सोहळा मोठ्या उत्साहामध्ये आयोजित करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इंटरनॅशनल सायन्स ओलिंपियाड या स्पर्धा परीक्षेत ५५ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल ऑफ एक्सलांस तर १० विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल ऑफ डिस्टिंक्शन मिळाले या कार्यक्रमासाठी पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिव चे प्राचार्य माननिय. डॉ. श्री.वाल्मिक सोमासे, उप प्राचार्य श्री. निलेश जाधव, प्रशासकीय अधिकारी श्री. जीवन कुलकर्णी आदी मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात मा. प्राचार्य श्री. वाल्मिक सरांच्या मार्गदर्शनपर व्याख्याने झाली.

यानंतर सर्व यशस्वी व विजेत्या विद्यार्थ्यांचा पदक वितरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमात पालकांनी ही उपस्थिति दर्शवली व विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावण्यास व त्यांची प्रगती साधण्यात अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे मोलाचे योगदान आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, कर्मचारी वर्ग यांचे सहकार्य लाभले.


**लातूर समाचार उस्मानाबाद**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**



**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHAIKH MOHAMMEDALI ISMAIL. TO:SHAIKH MOHAMADALI ISMAIL.
Hence for this Declaration i will be known by this name and will use SHAIKH MOHAMADALI ISMAIL. in future the same will used by my family husband /wife, children and relative.
**OLD NAME** - SHAIKH MOHAMMEDALI ISMAIL.
**NEW NAME** :- SHAIKH MOHAMADALI ISMAIL.
Address - GALLI NO. 20,UMAR CHOWK,KHAJA NAGAR, OSMANABAD. DIST.- OSMANABAD. -413501.
Adhar no.-435674184145 Mob. No.-9404281432

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHAIKH NASREEN BEGUM MOHAMMED ALI. TO:SHAIKH NASREEN BEGUM MOHAMADALI.
Hence for this Declaration i will be known by this name and will use SHAIKH NASREEN BEGUM MOHAMADALI. in future the same will used by my family husband /wife, children and relative.
**OLD NAME** - SHAIKH NASREEN BEGUM MOHAMMED ALI.
**NEW NAME** - SHAIKH NASREEN BEGUM MOHAMADALI.
Address - GALLI NO.20,KHAJA NAGAR, OSMANABAD. DIST.- OSMANABAD. -413501.
Adhar no.-306472787917 Mob. No.-9404281432


## उन्हाळ्यात प्राण्यासाठी पाण्याची व्यवस्था करा

## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ १ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649